महात्मा फुले कृषि विद्यापीठ

अन्नं बहु कुर्वीत
तद् व्रतम्

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

## ई वार्ता

डिसेंबर २०२२




मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २५११/२०२३

मफुकृवि ई वार्ता
डिसेंबर २०२२

वर्ष :२, अंक क्रं. : २४, डिसेंबर, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे सहा वाण, चार कृषि यंत्रे आणि ७० कृषि तंत्रज्ञान शिफारशींना मान्यता


रब्बी ज्वारी-फुले पुर्वा


राजमा- फुले विराज


उडिद-फुले राजन


मुग-फुले सुवर्ण


ऊस-फुले १५०१२


हळद-फुले हरिद्रा


ट्रॅक्टरचलित फुले सेंद्रिय भरखते देण्याचे यंत्र


ट्रॅक्टरचलित फुले दोन ओळींमध्ये चालणारा फॉरवर्ड-रिव्हर्स रोटाव्हेटर


ट्रॅक्टरचलित फुले केळी खुंट कुट्टी यंत्र


फुले रस काढणी यंत्र

**दि. १६ डिसेंबर, २०२२.** महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे आणि राज्यातील चारही कृषि विद्यापीठे यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली येथे तीन दिवसीय संयुक्त कृषि संशोधन आणि विकास समितीची ५० वी बैठक संपन्न झाली. या बैठकीचे उद्घाटन राज्याचे कृषि मंत्री तथा कृषि विद्यापीठांचे प्रतिकुलपती मा.ना.श्री. अब्दुल सत्तार यांचे हस्ते झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजय सावंत यांनी भुषविले. याप्रसंगी कृषि खात्याचे प्रधान सचिव श्री. एकनाथ डवले, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इंद्रमणी, अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख व महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक श्री. रावसाहेब भागडे उपस्थित होते.

महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संचालक संशोधन डॉ. सुनिल गोरंटीवार यांच्या नेतृत्वाखाली शेतपिके वाण प्रसारण व शेतपिके वाण संरक्षण आणि शेतकरी अधिकारी कायद्यांतर्गत या कृषि विद्यापीठाच्या नवीन वाण आणि तंत्रज्ञान शिफारशी सादर केल्या व त्यास समितीने मान्यता दिली. या बैठकीत महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे सहा वाण, चार कृषि यंत्रे अवजारे आणि ७० पीक उत्पादन तंत्रज्ञान शिफारशींना मान्यता देण्यात आली. यामध्ये रब्बी ज्वारी-फुले पुर्वा, राजमा-फुले विराज, उडीद-फुले राजन, मुग-फुले सुवर्ण, ऊस-फुले १५०१२, आणि हळद-फुले हरिद्रा हे वाण प्रसारीत करण्यात आले. तसेच ट्रॅक्टरचलीत फुले सेंद्रिय भरखते देण्याचे यंत्र, ट्रॅक्टरचलीत फुले दोन ओळींमध्ये चालणारा फॉरवर्ड-रिव्हर्स रोटाव्हेटर, ट्रॅक्टरचलीत फुले केळी खुंट कुट्टी यंत्र व फुले रस काढणी यंत्र प्रसारीत करण्यात आले असल्याची माहिती महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी दिली.

मफुकृवि ई वार्ता
डिसेंबर २०२२

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात एमपीकेव्ही क्लायमेक्स-२०२२ ची शानदार सुरुवात




**दि. २० डिसेंबर, २०२२.** कृषि शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांनी नोकरी करण्यापेक्षा उद्योजक बनून इतरांना नोकरी उपलब्ध करून द्यावी. भारत हा शेतीप्रधान देश असल्यामुळे भारतामध्ये कृषि संबंधित उद्योगांना उज्वल भविष्य असल्याचे प्रतिपादन नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या शिक्षण विभागाचे उपमहासंचालक व नाहेप प्रकल्पाचे राष्ट्रीय संचालक डॉ. आर.सी. अग्रवाल यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे नाहेप-कास्ट प्रकल्प व माजी विद्यार्थी संघटनेच्या प्रयत्नातून एमपीकेव्ही क्लायमेक्स-२०२२ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अग्रवाल बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील हे होते. याप्रसंगी व्यासपीठावर विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सदस्य श्री. संजीव भोर, नाशिक येथील सह्याद्री फार्मर्स कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी इंजि. विलास शिंदे, संगमनेर येथील श्रमिक उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष श्री. साहेबराव नवले पाटील, महाराष्ट्र शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. विजय नवल पाटील, धुळे येथील उद्योजक श्री. सरकारसाहेब जे.जे. रावळ, पुणे येथील काकडे फुडच्या श्रीमती श्वेता काकडे, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, संशोधन संचालक डॉ. सुनील गोरंटीवार, विस्तार शिक्षण संचालक डॉ. तानाजी नरुटे, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे, नियंत्रक डॉ. बापूसाहेब भाकरे, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके व कार्यक्रमाचे संयोजन सचिव डॉ. मुकुंद शिंदे उपस्थित होते.

डॉ. अग्रवाल पुढे म्हणाले की दरवर्षी भारतातील कृषि विद्यापीठांमधून दोन लाख विद्यार्थी शिक्षण घेऊन बाहेर पडतात. मार्केटमध्ये ज्याची गरज आहे त्याचा अंतर्भाव आपल्याला सध्याच्या शिक्षण पद्धतीत करावा लागणार आहे. उद्योगांमधील तज्ञांचा सल्ला घेऊन त्यांच्या सूचनेनुसार शैक्षणिक पद्धतीमध्ये बदल केला जात आहे. सध्या डिजिटल सिक्वेन्स माहितीचे युग असून भारतीय विद्यार्थ्यांचे भवितव्य आशादायी असल्याचे ते म्हणाले. कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की उद्योजक हा एका दिवसात तयार होत नसतो तर त्यासाठी त्याच्यामध्ये खुप मोठी जिद्द, सातत्यपूर्ण कष्ट, संयमशीलता या गुणांबरोबरच आयुष्यातील महत्वाची वर्ष खर्चावी लागतात तेव्हा यशस्वी उद्योजक तयार होतो. यावेळी कृषि उद्योजक श्री. साहेबराव नवले, श्रीमती श्वेता काकडे, श्री. सरकारसाहेब रावळ व श्री. अंकुश पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी ॲग्रीप्लास्टचे कार्यकारी संचालक श्री. राजीव कुमार रॉय यांनी सहाय्य केलेल्या ॲग्रीप्लास्ट स्कॉलरशीपचे तसेच एमपीकेव्ही क्लायमेक्स-२०२२ सोविनीअरचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत डॉ. प्रमोद रसाळ यांनी केले. डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी कास्ट प्रकल्पाचा आढावा तसेच एमपीकेव्ही क्लायमेक्स-२०२२ या कार्यक्रमात आयोजीत उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. मुकुंद शिंदे यांनी

वर्ष :२, अंक क्र. : २४, डिसेंबर, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

तर सूत्रसंचालन कु. सायली बिरादार हिने केले. सकाळच्या सत्रात विद्यार्थीनी वसतीगृहाचे उद्‌घाटन डॉ. अग्रवाल यांच्या शुभहस्ते करण्यात आले. तसेच मान्यवरांनी कृषि प्रदर्शनाचे उद्‌घाटन करुन कृषि पदवीधर उद्योजकांच्या उत्पादनांची माहिती घेतली. या कार्यक्रमासाठी कृषिभूषण श्री. सुरसिंग पवार, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. शिवाजीराव जगताप, सहयोगी अधिष्ठाता, विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ, प्राध्यापक व विद्यार्थी विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या सात नविन वाणांना राष्ट्रीय स्तरावर मान्यता


फुले११०८२


फुले कावेरी


फुले अनुपम


फुले तृप्ती


फुले पूर्णा


फुले वसु


फुले यशोमती

**दि. ७ डिसेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीच्या ऊस, गहू, ज्वारी, तूर, तीळ व उडदाच्या वाणांना भारतीय कृषि संशोधन परिषदेच्या केंद्रिय पीक वाण प्रसारण उपसमितीच्या बैठकीत राष्ट्रीय स्तरावर मान्यता देण्यात आली. उसाचा फुले ११०८२ (कोएम ११०८२), गव्हाचा फुले अनुपम, रब्बी ज्वारीचा फुले यशोमती, तूरीचे फुले तृप्ती व फुले कावेरी, तीळ पिकाचा फुले पुर्णा आणि उडदाचा फुले वसु या वाणांचा समावेश आहे.

ऊस पिकाचा फुले ११०८२ हा लवकर पक्व होणाऱ्या वाणाचे ऊस उत्पादनात १५.४० टक्के, साखर उत्पादन

१३.५२ टक्के, हा वाण तुल्यवाण कोसी ६७१ पेक्षा सरस आढळून आला आहे. साखर उतारा कोसी ६७१ इतकाच १४.१७ टक्के मिळाला आहे. या वाणाचा वाढीचा वेग जास्त असून फुटव्यांची संख्या मर्यादित आहे. वाढ्यावर कुस नाही. या वाणाची मुळे जमिनीत खोलवर जात असून मुळांचा पसारा अधिक असल्याने पाण्याचा ताण सहन करणारा हा वाण असून, ऊस लोळण्याचे प्रमाण नगन्य आहे. हा वाण चाबूक काणी व पाने पिवळी पडणाऱ्या रोगास प्रतिकारक असून मर आणि लालकूज या रोगांना मध्यम प्रतिकारक आहे. खोडकिड, कांडीकिड आणि शेंडेकिडीस कमी प्रमाणात बळी पडतो. हा वाण महाराष्ट्रात लागवडीसाठी अधिसूचित करण्यात आला आहे. गव्हाचा सुधारीत वाण फुले अनुपम (एन.आय.ए.डब्ल्यु. ३६२४) या वाणाची महाराष्ट्रामध्ये नियंत्रित पाण्याखाली वेळेवर पेरणीसाठी शिफारस करण्यात आलेली आहे. हा वाण आकर्षक टपोरे दाणे, प्रथिनांचे प्रमाण ११.४ टक्के असून तांबेरा रोगास प्रतिकारक्षम तसेच चपातीसाठी उत्तम वाण आहे. याचा पक्व होण्याचा कालावधी १०५ ते ११० दिवस असून उत्पादन क्षमता ३० ते ३५ क्वि./हे. असणाऱ्या या वाणात पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता आहे.

रब्बी ज्वारीचा फुले यशोमती (आर.एस.व्ही. १९१०) हा वाण महाराष्ट्रातील रब्बी हंगामात वेळेवर पेरणी आणि जिरायती लागवडीसाठी प्रसारीत करण्यात आला आहे. या वाणाचे सरासरी उत्पादन प्रति हेक्टरी ९.३ क्वि. असून उच्च उत्पादनक्षमता प्रति हेक्टरी १२.०० क्वि. आहे. प्रचलीत वाण फुले अनुराधा व मालदांडी ३५–१ पेक्षा अनुक्रमे ८ टक्के आणि १९ टक्के अधिक उत्पादन देणारा असून याचा पक्वता कालावधी ११२ ते ११५ दिवस आहे. या वाणाचे पांढरे शुभ्र रंगाचे टपोरे दाणे असून हा खोड माशीस प्रतिकारक व खडखड्या रोगास मध्यम प्रतिकारक आहे. तूरीचा फुले तृप्ती (पी.टी.१०–१) हा वाण देशाच्या मध्य विभागातील महाराष्ट्र, मध्यप्रदेश, गुजरात आणि छत्तीसगड या राज्यांसाठी खरीप हंगामात वेळेवर पेरणी आणि जिरायत/बागायत लागवडीसाठी प्रसारीत करण्यात आला आहे. या वाणापासून सरासरी प्रति हेक्टरी २२.६६ क्विंटल उत्पादन मिळते. या वाणाची उच्च उत्पादनक्षमता प्रति हेक्टरी ३२.०० क्विंटल इतकी आहे. प्रचलीत वाण फुले राजेश्वरी आणि बी.डी.एन.–७११ या वाणांपेक्षा या वाणांने अनुक्रमे ३३.४५ टक्के आणि ४२.९७ टक्के अधिक उत्पादन दिलेले आहे. या वाणाचा पक्वता कालावधी १६५ दिवस आहे. या वाणाचे फिकट तपकिरी रंगाचे टपोरे दाणे असुन १०० दाण्यांचे वजन १०.८१ ग्रॅम आहे. हा वाण मर आणि वांझ रोगास मध्यम प्रतिकारक असुन शेंगा पोखरणारी अळी आणि शेंगमाशी या किडीचा कमी प्रार्दुभाव दिसून आला. तुरीचा दुसरा वाण फुले कावेरी (पी.टी.११–४) हा देशाच्या दक्षिण विभागातील तामिळनाडु, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगाना आणि ओडीशा या राज्यांसाठी खरीप हंगामात वेळेवर पेरणी आणि जिरायत तसेच बागायत लागवडीसाठी प्रसारीत करण्यात आला आहे. या वाणापासून सरासरी प्रति हेक्टरी १५.९१ क्विंटल उत्पादन मिळते. या वाणाची उच्च उत्पादनक्षमता प्रति हेक्टरी २४.०० क्विंटल इतकी आहे. प्रचलीत वाण फुले राजेश्वरी या वाणापेक्षा या वाणाने २२.८६ टक्के अधिक उत्पादन दिलेले आहे. या वाणाचा पक्वता कालावधी १६४ दिवस आहे. या वाणाचे फिकट तपकिरी रंगाचे अधिक टपोरे दाणे असून १०० दाण्यांचे वजन ११.५२ ग्रॅम आहे. हा वाण मर आणि वांझ रोगास मध्यम प्रतिकारक असून शेंगा पोखरणारी अळी आणि शेंगमाशी या किडीचा सुध्दा कमी प्रार्दुभाव दिसून आला.

तीळ या पिकाचा जे.एल.टी. ४०८–२ (फुले पूर्णा) हा वाण महाराष्ट्रातील खान्देश आणि मराठवाडा विभागातील उन्हाळी हंगामासाठी प्रसारीत करण्यात आला आहे. याचे उत्पादन ७०५ किलो प्रति हेक्टर असून यामध्ये तेलाचे प्रमाण ४९ टक्के आहे. याचा एकुण पक्वता कालावधी ९५ ते १०० दिवसांचा असून १००० दाण्यांचे वजन ४ ग्रॅम इतके आहे. हा वाण पानावरील ठिपके व पुर्णगुच्छ रोगासाठी प्रतिकारक असून पाने गुंडाळणारी अळी व फळ पोखरणाऱ्या अळीसाठी सहनशील आहे. उडदाचा पियु ०६०९–४३ (फुले वसु) हा वाण महाराष्ट्रातील उडीद पिकवणाऱ्या भागासाठी प्रसारीत करण्यात आला असून या वाणाची अधिकतम उत्पादनक्षमता १९ क्विं./हे. आहे. या वाणाचा टपोरा दाना असून १०० दाण्याचे वजन ४.८७ ग्रॅम आहे.  हा वाण भुरी व पिवळा विषाणू या रोगास प्रतिकारक्षम असून याचा परिपक्वता कालावधी ७३ दिवसांचा आहे.

विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तत्कालीन संशोधन संचालक व डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोल्याचे कुलगुरु डॉ. शरद गडाख व विद्यमान संशोधन संचालक डॉ. सुनिल गोरंटीवार यांच्या नेतृत्वामध्ये मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्राचे ऊस विशेषज्ञ डॉ. भरत रासकर, डॉ. रामदास गारकर, गहू विशेषज्ञ डॉ. सुरेश दोडके, ज्वारी सुधार प्रकल्पाचे वरिष्ठ ज्वारी पैदासकार डॉ. दिपक दुधाडे, कडधान्य सुधार प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नंदकुमार कुटे व जळगाव येथील तेलबिया संशोधन केंद्राचे डॉ. संजीव पाटील, डॉ. सुमेरसिंग राजपूत यांच्यासह पाडेगाव ऊस संशोधन केंद्र, निफाड येथील कृषि संशोधन केंद्र, ज्वारी सुधार प्रकल्प, कडधान्य सुधार प्रकल्प व तेलबिया संशोधन केंद्रातील सहकाऱ्यांनी या वाणांसाठी पुढाकार घेतला.

## केंद्रिय कृषि आणि शेतकरी कल्याण सचिव श्री. मनोज अहुजा यांची कृषि विद्यापीठास भेट





**दि. २८ डिसेंबर, २०२२.** कृषि क्षेत्र हे आव्हानात्मक क्षेत्र आहे. या क्षेत्रात महात्मा फुले कृषि विद्यापीठाने सर्वोत्कृष्ट कार्य केलेले आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठात औषध फवारणीसाठी ड्रोनचा वापर, हायपर स्प्रेट्रम तंत्रज्ञानाचा वापर, रोबोटीक तंत्रज्ञानाचा वापर, स्वयंचलीत हवामान केंद्र व सिंचन प्रणाली यामध्ये उत्कृष्ट काम सुरु आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी उत्पादन तंत्रज्ञान ते मुल्यवर्धन व त्याचे विपणन अशी साखळी तालुका स्तरावर तयार करणे गरजेचे आहे. प्रत्येक गावात स्वयंचलीत हवामान केंद्र स्थापन करण्याचे धोरण लवकरच केंद्र सरकार आखत आहे. देश अन्नधान्याने स्वयंपूर्ण झाला आहे याचे श्रेय पूर्णपणे कृषि शास्त्रज्ञांच्या संशोधनाला जाते असे प्रतिपादन नवी दिल्ली येथील भारत सरकारचे कृषि आणि शेतकरी कल्याण सचिव श्री. मनोज अहुजा यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठात भारत सरकारचे कृषि आणि शेतकरी कल्याण सचिव श्री. मनोज अहुजा यांनी सदिच्छा भेट दिली यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, भारत सरकारचे कृषि आणि शेतकरी कल्याण विभागाचे अतिरिक्त सचिव श्री. अभिलक्ष लिखी, आयुक्त (उद्यान) डॉ नविनकुमार पटले, संशोधन संचालक डॉ. सुनिल गोरंटीवार, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाचे उपसंचालक श्री. होशियार सिंग, ॲगमार्कचे विपणन विभागाचे संचालक श्री. बी.के. जोशी, विपणन अधिकारी सौ. सोनाली बागडे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. शिवाजी जगताप, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे, नियंत्रक डॉ. बापुसाहेब भाकरे, सहयोगी अधिष्ठाता डॉ. उत्तम चव्हाण, डॉ. श्रीमंत रणपिसे, डॉ. गोरक्ष ससाणे व सर्व विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

अतिरिक्त सचिव श्री. अभिलक्ष लिखी म्हणाले या कृषि विद्यापीठाने भरडधान्यामध्ये चांगले संशोधन केलेले आहे.

वर्ष :२, अंक क्रं. : २४, डिसेंबर, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

सन २०२३ हे आंतराष्ट्रीय पौष्टीक भरडधान्य वर्ष असल्याने या विद्यापीठात २०२३ मध्ये भरडधान्यावर राष्ट्रीय परिसंवाद आणि प्रदर्शनाचे आयोजन करावे. यावेळी मार्गदर्शन करतांना कुलगुरु डॉ. पाटील म्हणाले विद्यापीठाने विकसीत विविध पिकांचे वाण हे राज्यातच नव्हे तर बाहेरच्या राज्यातही घेतले जातात. यामध्ये विद्यापीठाने विकसीत डाळिंबाचा भगवा हा वाण देशात डाळिंबाच्या ८० टक्के क्षेत्रावर लावला जातो. राज्यातील उसाखालील क्षेत्रापैकी ९० टक्के क्षेत्र हे या विद्यापीठाच्या विकसीत वाणांखाली आहे. विद्यापीठाच्या मुलभुत बियाण्याची किंमत ही प्रामाणीत बियाण्यापेक्षा कमी असून ती प्रामाणीत बियाण्यापेक्षा तीन पट असावी असे धोरण शासनाने करावे. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ यांनी विद्यापीठाचा शिक्षण, संशोधन व विस्ताराचा आढावा सादर केला. डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी कास्ट–कासम प्रकल्पात सुरु असलेल्या संशोधनसंदर्भात माहिती दिली व मान्यवरांचे स्वागत केले. डॉ. महानंद माने यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

याप्रसंगी मान्यवरांनी विद्यापीठाच्या कास्ट–कासम प्रकल्पाच्या ड्रोन प्रयोगशाळा, आय.ओ.टी. तंत्रज्ञानचलीत सिंचन प्रणाली, रोबोटीक्स तंत्रज्ञान प्रयोगशाळा, आय.ओ.टी. पार्क, फळबाग प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, कास्ट–कासम प्रात्यक्षिक प्रक्षेत्राला भेटी दिल्या. यावेळी मान्यवरांना ड्रोनद्वारे औषधाची फवारणीचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. प्रक्षेत्र भेटीदरम्यान डॉ. मुकुंद शिंदे, डॉ. सचिन नलावडे, डॉ. पवन कुलवाल, डॉ. सुनिल कदम, डॉ. उल्हास सुर्वे, डॉ. राजेंद्र हिले, डॉ. जोशी यांनी माहिती दिली. याप्रसंगी विद्यापीठाचे अधिकारी, कृषि विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात एमपीकेव्ही क्लायमेक्स–२०२२ च्या प्रदर्शनास प्रचंड प्रतिसाद








**दि. २१ डिसेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे नाहेप–कास्ट प्रकल्प व माजी विद्यार्थी संघटनेच्या प्रयत्नातून एमपीकेव्ही क्लायमेक्स–२०२२ या कार्यक्रमाच्या निमित्ताने कृषि प्रदर्शन आयोजीत करण्यात आले आहे. या

प्रदर्शनामध्ये कृषि विषयक विविध कंपन्यांचे ४० पेक्षा जास्त स्टॉल्स, विद्यापीठातील विविध संशोधन प्रकल्पांचे १० स्टॉल्स तसेच विविध कृषि महाविद्यालयांच्या ३० स्टॉल्सचा यामध्ये समावेश आहे. याचबरोबर गृहपयोगी वस्तूंच्या २० स्टॉल्सचाही या प्रदर्शनात समावेश आहे. या प्रदर्शनाबरोबरच यावेळी रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये २१ नामांकीत कंपन्या सहभागी झाल्या असून २००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी नोकरीसाठी मुलाखती दिल्या आहेत. प्रदर्शनाच्या दुसऱ्या दिवशी कृषि महाविद्यालय पुणे, धुळे, कोल्हापूर तसेच डॉ. आण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय आणि पदव्युत्तर महाविद्यालय येथील माजी विद्यार्थ्यांचा मेळावा भरविण्यात आला. या मेळाव्यामध्ये ५००० च्या वर माजी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. याबरोबरच डॉ. नानासाहेब पवार सभागृहात तांत्रिक चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये व्हल्यु चेन-शेतकरी उत्पादक कंपन्या, बियाणे प्रक्रिया व लागवडीची रोपे, कृषि यंत्रे व अवजारे तसेच जलव्यवस्थापनाचे साधने, रासायनिक औषधे, बुरशीनाशके व तणनाशके, खते व सूक्ष्म अन्नद्रव्ये, डेअरी, अन्नप्रक्रिया व पदार्थ या विषयांवर विविध तज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले. या एमपीकेव्ही क्लायमेक्सच्या पहिल्या दिवशी २०००० च्या वर शेतकरी, उद्योजक, विद्यार्थी यांनी प्रदर्शनास भेट दिली आणि दुसऱ्या दिवशी २५००० च्या वर शेतकरी, उद्योजक, विद्यार्थी यांनी प्रदर्शनास भेट दिली. खास करुन कृषि शिक्षण प्रदर्शनाच्या दालनाला विविध जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात एमपीकेव्ही क्लायमेक्स-२०२२ चा समारोप




**दि. २२ डिसेंबर, २०२२.** पूर्वी आपल्या देशात बारा बलुतेदार पध्दत होती. त्यावेळी आपला देश सुजलाम सुफलाम होता. व्यवहारात वस्तुच्या व सेवेच्या बदल्यात धान्य दिले जायचे. आता व्यवहार नोटांमध्ये होतात, त्यामुळे अर्थव्यवस्था बिघडली आहे. आपल्या नैसर्गिक संपत्तीमुळे अन्न, आरोग्यसेवा ही आपल्या देशाची बलस्थाने झालेली आहेत. याजोरावर आपण भविष्यात जगावर राज्य करणार आहोत असे प्रतिपादन पुणे येथील थिंक टँक अर्थक्रांतीचे संस्थापक श्री. अनिल बोकील यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे नाहेप-कास्ट प्रकल्प व माजी विद्यार्थी संघटनेच्या प्रयत्नातून एमपीकेव्ही क्लायमेक्स-२०२२ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. समारोप कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून श्री. अनिल बोकील बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील हे होते. याप्रसंगी व्यासपीठावर नवी दिल्ली येथील भाकृअप, कास्ट-नाहेपच्या राष्ट्रीय समन्वयक डॉ. अनुराधा अग्रवाल, नाबार्डचे जनरल मॅनेजर श्री. सुब्रत कुमार नंदा, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, संशोधन संचालक डॉ. सुनील गोरंटीवार, विस्तार शिक्षण संचालक

डॉ. तानाजी नरुटे, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे, नियंत्रक डॉ. बापूसाहेब भाकरे, सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, डॉ. उत्तम चव्हाण, डॉ. श्रीमंत रणपिसे, डॉ. चिंतामणी देवकर, डॉ. राजेंद्र सुर्यवंशी, डॉ. गोरक्ष ससाणे, डॉ. जयप्रकाश गायकवाड व संयोजन सचिव डॉ. मुकुंद शिंदे उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय भाषणात कुलगुरु डॉ. पाटील म्हणाले की शेतीमुळेच आपल्या देशाचे भविष्य उज्वल आहे हे लॉकडाऊनच्या काळात अधोरेखीत झालेले आहे. आता शेती आणि शेती शिक्षणाला समाजात महत्व प्राप्त होत आहे. डॉ. अग्रवाल म्हणाल्या भारताची अर्थव्यवस्था ही कृषिवर अवलंबुन आहे. यामुळे आता प्राथमिक शिक्षणामध्ये कृषिच्या विषयाचा समावेश करण्यात येणार आहे. देशाची कृषि शिवाय प्रगती नाही ही जाण धरुन शालेय विद्यार्थ्यांनी कृषि विषयामध्ये आवड निर्माण करावी. श्री. नंदा आपल्या भाषणात म्हणाले की नाबार्डमार्फत विविध योजनांतर्गत मुल्यवर्धनाला प्राध्यान्याने अर्थसहाय्य दिले जात आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ यांनी केले. डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी या एमपीकेव्ही क्लायमेक्स कार्यक्रमाच्या उपलब्धीविषयीची माहिती दिली. यावेळी ते म्हणाले रोजगार मेळाव्यामध्ये ७५ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी मिळाल्या. शिक्षण व संशोधनासाठी राज्य, राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय कंपन्यांबरोबर सामंजस्य करार करण्यात आले. शेतीमधील ड्रोन पायलट ट्रेनिंग संदर्भात शेतकऱ्यांमध्ये व तरुणांमध्ये जनजागृती झाली. एमपीकेव्ही क्लायमेक्समधील रोजगार मेळावा, शिक्षण मेळावा व कृषि प्रदर्शनाचा आढावा डॉ. मुकुंद शिंदे यांनी सादर केला. यावेळी एमपीकेव्ही क्लायमेक्स या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ व कास्ट प्रकल्पाचे सहसमन्वयक डॉ. मुकुंद शिंदे यांचा कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कृषि उद्योजक आयडॉल्स व शेतकरी आयडॉल्स यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. ड्रोन पायलट ट्रनिंग सेंटरचे प्रमुख डॉ. सचिन नलावडे, डॉ. सुनिल कदम, मुंबई येथील ग्राउंड झीरो एरोस्पेसचे श्री. राहुल आंबेगावकर व ध्रिती शहा यांचाही यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आल. आभार प्रदर्शन डॉ. रवी आंधळे यांनी तर सूत्रसंचालन कु. सायली बिरादार हिने केले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठातून विभाग प्रमुख, शास्त्रज्ञ, प्राध्यापक, शेतकरी व विद्यार्थी–विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री. महादेव जाधव व श्री. लक्ष्मण डोळे हे आहेत डिसेंबर महिन्याचे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे आयडॉल्स




**दि. १ डिसेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या संकल्पनेतून मफुकृवि आयडॉल्स हा उपक्रम गतवर्षी सुरु झालेला आहे. डिसेंबर महिन्यातील महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे शेतकरी आयडॉल म्हणुन

श्री. महादेव जाधव व कृषि उद्योजक म्हणुन श्री. लक्ष्मण डोळे यांची निवड झालेली आहे. श्री. महादेव जाधव हे मु. मांघर, पो. तळदेव, ता. महाबळेश्वर, जि. सातारा येथील शेतकरी असून कृषि पदवीधर श्री. लक्ष्मण डोळे हे एम.आय.डी.सी. मालेगांव, जि. नाशिक येथील कृषि उद्योजक आहेत. शेतकरी आयडॉल श्री. महादेव जाधव यांनी शास्त्रशुध्द पध्दतीने मधमाशीपालन करुन सेंद्रिय मधाचे उत्पादन घेण्यावर भर दिला आहे. मधमाशीपालनामुळे शेतीमधील उत्पादनात ३० ते ४० टक्के वाढ झालेली असून सातेरी मधमाशीपालनातुन मिळणाऱ्या मध, रॉयल जेली, पराग व मेणामुळे उत्पन्नात वाढ झालेली आहे. महाराष्ट्र शासनाद्वारे त्यांचे मांघर हे गांव मधाचे गांव म्हणून ओळखले जाते. कृषि उद्योजक श्री. लक्ष्मण डोळे यांनी धुळे कृषि महाविद्यालयातुन कृषि शिक्षणची पदवी घेतलेली आहे. त्यांनी शेतकऱ्यांच्या उत्कर्षासाठी मल्टिमोल मायक्रोफर्टीलायझर कंपनीची स्थापना सन १९९४ मध्ये करुन नेहमीच गुणवत्तेला प्राधान्य देवून आधुनिक प्रयोगशाळेच्या माध्यमातून सेवा प्रदान केली आहे. तसेच प्रोबायोटीक तंत्रज्ञानावर आधारीत अधिक तीव्रतेचे बायोफर्टीलायझर व बायोपेस्टीसाईडची निर्मिती व बायोफर्टीलायझरचे १०० बिलीयन्स प्रती ग्रॅम स्पोरमध्ये उत्पादन घेत आहेत. त्यांच्या कंपनीद्वारे तयार केलेल्या उत्पादनांची निर्यात देशात तसेच विदेशातही होत आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व कृषि महाविद्यालये, कृषि संशोधन केंद्रे, कृषि तंत्र विद्यालये यांच्या दर्शनीय क्षेत्रात ही आयडॉल्स् प्रदर्शीत करण्यात येत आहे.

## ड्रोन तंत्रज्ञानावर कार्यशाळेचे आयोजन





**दि. ८ डिसेंबर, २०२२.** ड्रोन तंत्रज्ञान वेळेची बचत करणारे असून त्याच्या वापराविषयीची जागृकता कृषि विज्ञान केंद्राच्या विषयतज्ञ व शेतकऱ्यांमध्ये होणे गरजेचे आहे. औषध फवारणीच्या कामासाठी ड्रोनचा वापर वाढल्यास शेतकऱ्यांना त्याचा फायदा होणार आहे असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जागतीक बँक अर्थसहाय्यीत राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवि दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने राहुरी येथे हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान प्रकल्पांतर्गत शेतीसाठी ड्रोनचा वापर या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी करण्यात आले होते. यावेळी डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, कृषि यंत्रे व शक्ती विभाग प्रमुख डॉ. सचिन नलावडे, कास्ट प्रकल्पाचे सहप्रमुख संशोधक डॉ. मुकुंद शिंदे यावेळी उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. पवार म्हणाले की आधुनिक शेतीमध्ये नविन तंत्रज्ञानाचा वापर वाढला पाहिजे आणि त्यामध्ये प्रामुख्याने ड्रोनचा शेतीतील वापर येणाऱ्या काळात मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे.

यावेळी झालेल्या तांत्रिक चर्चासत्रात डॉ. सचिन नलावडे व डॉ. गिरीषकुमार भणगे यांनी शेतीसाठी ड्रोनचा वापर, ड्रोनचे प्रकार, तपशील व कार्यप्रणाली, फवारणीसाठी ड्रोनचा वापर, नियम, पुर्व तयारी, वापराच्या पध्दती व काम करतांना घ्यावयाची काळजी या विषयी मार्गदर्शन केले. डॉ. नंदकुमार भुते यांनी किड नियंत्रणासाठी ड्रोनची उपयुक्तता याबद्दल मार्गदर्शन केले. इंजि. निलकंठ मोरे यांनी प्रशिक्षणार्थींना कास्ट प्रकल्पाच्या प्रक्षेत्रावर फवारणीचे ड्रोनचे प्रात्यक्षिक दिले. कार्यशाळेच्या सांगता समारंभासाठी विस्तार शिक्षण संचालक डॉ. तानाजी नरुटे यांच्या शुभहस्ते प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. आभार प्रदर्शन डॉ. सुनिल कदम यांनी तर सूत्रसंचालन डॉ. शुभांगी घाडगे यांनी केले. या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणुन डॉ. गिरीषकुमार भणगे व इंजि. निलकंठ मोरे यांनी काम पाहिले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात जागतिक मृदा दिनाचे आयोजन





**दि. ५ डिसेंबर, २०२२.** जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढविण्यासाठी प्रयत्न, ठराविक पिकांचे उत्पादन घेवून जमिनीला विश्रांती द्यायला हवी. जमिनीतील सूक्ष्म जीवांचे प्रमाण वाढविण्याबरोबरच मातीची धूप कमी करणे, पाणी व्यवस्थापन करणे या सारखे उपाय योजून जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी लक्ष दिले तरच भविष्यात जमीन शाश्वत उत्पन्न देईल असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे विद्यापीठ, महाराष्ट्र शासन, कृषि विभाग, राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टीलायझर्स लि., मुंबई व तिफण फाउंडेशन यांचे संयुक्त विद्यमाने आयोजीत जागतीक मृदा दिन व राज्यस्तरीय बिजप्रक्रिया स्पर्धा पारितोषीक वितरण सोहळा हा कार्यक्रम डॉ. अण्णासाहेब शिंदे सभागृहात आयोजीत करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील बोलत होते. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन राज्याच्या आदर्श गाव समितीचे कार्याध्यक्ष पद्मश्री श्री. पोपटराव पवार उपस्थित होते. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, पुणे येथील विभागीय कृषि सहसंचालक श्री. रफिक नाईकवाडी, राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टीलायझर लि., पुणेचे उपमहाव्यवस्थापक श्री. मधुकर पाचारणे, नियंत्रक तथा मृद विज्ञान व कृषि रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. बापुसाहेब भाकरे, अहमदनगरचे कृषि सहसंचालक श्री. रविंद्र माने, राहुरी तालुका कृषि अधिकारी श्री. महेंद्र ठोकळे, तिफण फाउंडेशनचे संस्थापक श्री. सुखदेव जमधडे व अहमदनगर येथील राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टीलायझर लि.चे विभागीय व्यवस्थापक श्री. नितिन बाजड उपस्थित होते.

कुलगुरु डॉ. पाटील पुढे म्हणाले की पाण्याच्या अतिवापरामुळे जमिनी खराब होत आहे. विद्यापीठांतर्गत असलेल्या कसबे डिग्रज येथील १० हजार एकर जमिनीवर क्षारपड जमीन सुधारणा कार्यक्रम सुरु केला आहे. पाचट न जाळता त्याचे

व्यवस्थापन करुन खोडवा उसाची उत्पादकता ५० टनावरुन ७७ टनापर्यंत वाढली आहे. पद्मश्री श्री. पोपटराव पवार आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की शेतीच्या उज्वल भविष्यासाठी पाण्याच्या ताळेबंदाबरोबरच मातीचे व्यवस्थापन हे जर व्यवस्थीत केले नाही तर आपण कितीही विकासाचे गोडवे गायले तर आपले प्रश्न सुटनार नाहीत. विद्यापीठाचा पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्प हा देशाला दिशादर्शक ठरणार आहे असेही ते यावेळी आवर्जुन म्हणाले. यावेळी श्री. रफिक नायकवाडी व श्री. मधुकर पाचारणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बापूसाहेब भाकरे यांनी केले. यावेळी खरीप हंगाम बीजप्रक्रिया स्पर्धा–२०२२ या ऑनलाईन पध्दतीने घेतलेल्या राज्सस्तरीय स्पर्धेतील यशस्वी स्पर्धेकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सहयोगी अधिष्ठाता डॉ. श्रीमंत रणपिसे, डॉ. गोरक्ष ससाणे व कृषिभूषण श्री. सुरसिंग पवार उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शास्त्रज्ञ डॉ. अनिल दुरगुडे व डॉ. रितू ठाकरे यांनी अनुक्रमे माती परिक्षण आणि जमिनीचे आरोग्य व एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन श्रीमती अंजना सोनवलकर व मंडल कृषि अधिकारी डॉ. विनया बनसोडे यांनी तर आभार श्री. अनंत देशमुख यांनी केले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील तसेच कृषि विभागातील अधिकारी, कर्मचारी, राज्यातील विविध जिल्ह्यातून आलेले शेतकरी, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे रिमोट पायलट (ड्रोन) प्रशिक्षणाची सुरुवात



**दि. ६ ते १२ डिसेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नागरी विमान उड्डान महासंचालनालय भारत अधिकृत रिमोट पायलट प्रशिक्षण केंद्राच्या अंतर्गत रिमोट पायलट (ड्रोन) प्रशिक्षणाच्या प्रथम बॅचचे महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे करण्यात आले. या प्रशिक्षणाचे उद्घाटन संशोधन संचालक तथा कास्ट प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. सुनिल गोरंटीवार, कास्ट प्रकल्पाचे सह–प्रमुख संशोधक डॉ. मुकुंद शिंदे, कृषि यंत्रे व शक्ती विभागाचे प्रमुख डॉ. सचिन नलावडे तसेच जलसिंचन व निचरा विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. सुनिल कदम यांच्या उपस्थितीत पार पडले. या प्रशिक्षणाच्या उद्घाटनाप्रसंगी डॉ. गोरंटीवार म्हणाले की ड्रोन रिमोट पायलट प्रशिक्षणामुळे युवा पिढीला कृषि क्षेत्रात नविन रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. त्यांनी यावेळी भारत सरकारच्या ड्रोन संदर्भातील विविध योजनांची माहिती दिली. या तंत्रज्ञानाचा शेतकऱ्यांमधे जागृकता निर्माण करण्यासाठी विविध प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात येईल. या प्रशिक्षणासाठी महाराष्ट्रातून अमरावती, पुणे आणि नंदुरबार या जिल्हयातुन प्रशिक्षणार्थ्यींनी सहभाग घेतला आहे. या प्रशिक्षणांतर्गत ५ दिवसीय रिमोट पायलट प्रशिक्षण कार्यक्रम व दोन दिवसांचे कृषि ड्रोन प्रशिक्षण देण्यात येईल. या प्रशिक्षणासाठी डॉ. सचिन नलावडे व मुंबई येथील ग्राउंड झीरो एरोस्पेसचे

श्री. राहुल आंबेगावकर, ध्रिती शहा हे तज्ञ प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मुकुंद शिंदे यांनी तर आभार डॉ. सचिन नलावडे यांनी मानले.

## ड्रोन प्रशिक्षणाचा समारोप



**दि. १२ डिसेंबर, २०२२.** हवामान बदलाचा परिणाम दिवसेंदिवस वाढत असून त्याचा सर्वात जास्त परिणाम शेती क्षेत्रावर होत आहे. कृषि क्षेत्रात ड्रोनमुळे खते, बियाणे, किटकनाशके आणि तणनाशके या सारख्या सर्व संसाधनांचा कमी वापर करण्यासाठी, शेतीमधील कामाचे श्रम कमी करण्यासाठी उपयोग होतो. अशा परिस्थितीत ड्रोन तंत्रज्ञान शेती क्षेत्रासाठी वरदान ठरणार असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे रिमोट पायलट (ड्रोन) प्रशिक्षणाच्या प्रथम तुकडीच्या समारोप प्रसंगी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील ऑनलाईन उपस्थित होते. कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नागरी विमान उड्डान महासंचालनालय, भारत अधिकृत रिमोट पायलट प्रशिक्षण केंद्राच्या अंतर्गत पहिल्या प्रशिक्षणाचे आयोजन दि. ६ ते १२ डिसेंबर, २०२२ या कालावधीत महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे करण्यात आले होते. याप्रसंगी संशोधन संचालक तथा कास्ट प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. सुनिल गोरंटीवार, सहप्रमुख संशोधक डॉ. मुकुंद शिंदे, कृषि यंत्रे व शक्ती विभाग प्रमुख डॉ. सचिन नलावडे व जलसिंचन व निचरा विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. सुनिल कदम उपस्थित होते.

यावेळी डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी प्रशिक्षणार्थींशी ड्रोन तंत्रज्ञानाविषयी सविस्तर चर्चा केली. डॉ. सचिन नलावडे यांनी या सात दिवसीय रिमोट पायलट प्रशिक्षणाचा आढावा सादर केला. इंजि. योगेश जाधव, श्री. सुजीत वरटे, श्री. नंदकुमार कड्डु व श्री. भाऊराव बडाख यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या प्रशिक्षणासाठी डॉ. सचिन नलावडे व मुंबई येथील ग्राउंडझिरो एरोस्पेसचे श्री. राहुल आंबेगावकर व ध्रिती शहा हे तज्ञ लाभले होते. यावेळी सर्व प्रशिक्षणार्थींना डॉ. सुनिल गोरंटीवार यांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. सुनिल कदम यांनी केले. या प्रशिक्षणासाठी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधुन आलेल्या प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदविला.

अभिनंदन

## संशोधन संचालक डॉ. सुनिल गोरंटीवार उत्कृष्ट शास्त्रज्ञ पुरस्काराने सन्मानीत



**दि. १४ डिसेंबर, २०२२.** महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे आणि राज्यातील चारही कृषि विद्यापीठे यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली येथे तीन दिवसीय संयुक्त कृषि संशोधन आणि विकास समितीची ५० वी बैठक संपन्न झाली. या बैठकीच्या उद्घाटन कार्यक्रमात महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक तथा कृषि अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. सुनिल गोरंटीवार यांना राज्याचे कृषि मंत्री तथा चारही कृषि विद्यापीठांचे प्रतिकुलपती मा.ना.श्री. अब्दुल सत्तार यांच्या शुभहस्ते उत्कृष्ट शास्त्रज्ञ पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजय सावंत, परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इंद्र मणी, अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख व महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक श्री. रावसाहेब भागडे उपस्थित होते.

डॉ. गोरंटीवार हे महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे संशोधन संचालक म्हणुन कार्यरत असून जागतिक बँक अर्थसहाय्यीत कास्ट प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक म्हणुन ते काम पहात आहेत. डॉ. गोरंटीवार यांनी विद्यापीठामध्ये सहाय्यक प्राध्यापक या पदावर आपली सेवा सुरु केली असून त्यांच्या ३८ वर्षाच्या सेवेत त्यांनी विविध पदांवर काम केले आहे. डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी सन १९९६ मध्ये युनायटेड किंगडम येथील लॉफबरो विद्यापीठातून जल अभियांत्रिकी व विकास केंद्र या विषयात आचार्य पदवी संपादन केली असून पुढील उच्च पदव्युत्तर आचार्य पदवी याच विद्यापीठातून २००२ व २००६ मध्ये मिळविली आहे. त्यांनी आतांपर्यंत ७ आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय प्रकल्प पूर्ण केले असून ४ प्रकल्पांमध्ये सध्या काम सुरु आहे. त्यांचे आंतरराष्ट्रीय नियतकालीकांमध्ये ३१ शोधनिबंध, राष्ट्रीय नियतकालीकांमध्ये १२३ शोधनिबंध प्रकाशीत झालेले आहेत. त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिसंवादात १०० पेक्षा जास्त संशोधन पेपरांचे सादरीकरण केले आहे. त्यांची आंतरराष्ट्रीय स्तरावर ६ पुस्तके व राष्ट्रीय स्तरावर २ पुस्तके प्रकाशीत झालेली आहे. तसेच त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध समित्यांमध्ये महत्वाच्या पदावर काम केले आहे. नुकतीच भारत सरकारच्या कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालयाद्वारे स्थापन केलेल्या ड्रोन संबंधीत कमिटीवर त्यांची सदस्य म्हणुन भारत सरकारने नेमणूक केली आहे. संशोधनावर आधारित १५ मोबाईल ॲप, कॉपीराईट २५ तसेच संशोधनावर आधारित ९ वेब ॲप्लीकेशन तयार केले आहेत. डॉ. गोरंटीवार यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या फुले ऊस १५०१२ नवीन वाण बेणे विक्रीचा शुभारंभ





**दि. २३ डिसेंबर, २०२२.** फुले ऊस १५०१२ (एमएस १७०८२) या मध्यम पक्वतेच्या वाणाची निर्मिती फुले २६५ आणि को ९४००८ या वाणाच्या संकरातून महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत असलेले मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव या ठिकाणी केली आहे. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली येथे पार पडलेल्या ५० व्या संयुक्त कृषि संशोधन आणि विकास समितीच्या बैठकीत फुले ऊस १५०१२ या वाणाची सुरु, पुर्वहंगाम आणि आडसाली या तीनही हंगामात लागवडीसाठी शिफारस करण्यात आली. फुले ऊस १५०१२ हा मध्यम पक्वतेचा वाण को ८६०३२ पेक्षा ऊस आणि साखर उत्पादन अधिक देतो. ऊसातील साखरेचे प्रमाण हे को ८६०३२ व फुले २६५ पेक्षा जास्त असल्याने कारखान्याचा साखर उत्पादन वाढविण्यासाठी हा वाण फायदेशीर ठरणार आहे असे पाडेगाव संशोधन केंद्राचे प्रमुख आणि ऊस विशेषज्ञ डॉ. भरत रासकर यांनी सांगितले. या संशोधन केंद्राने प्रसारीत केलेल्या ऊस वाणांच्या बेण्याचा सर्व साखर कारखान्यांनी नवीन लागवडीसाठी उपयोग करावा असे आवाहन कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील आणि संशोधन संचालक डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी केले आहे. फुले ऊस १५०१२ वाणाचा ऊस जाड, कांडया सरळ आणि कांडयावर पांढऱ्या रंगाचा थर आहे. पाण्याचा ताण सहन करणारा वाण आहे. चाबूक काणी रोगास प्रतिकारक असून मर रोगास मध्यम प्रतिकारक आहे. तुरा उशिरा व कमी प्रमाणात येतो. पाने मध्यम रूंदीची, सरळ व टोकदार, पानाचे टोपनावर कूस नाही, पाचट सहज निघते.

महाराष्ट्रातील पाडेगाव, व्हीएसआय, पुणे आणि प्रवरानगर येथे दोन हंगामात घेतलेल्या लागवड ऊसाच्या ६ आणि खोडव्याच्या ३ अशा ९ बहुस्थानीय चाचणीमध्ये आडसाली, पूर्वहंगामी आणि सुरू हंगामामध्ये फुले ऊस १५०१२ या वाणाचे ऊसाचे उत्पादन हेक्टरी अनुक्रमे १६४, १५६ आणि १३० टन मिळाले. त्याचप्रमाणे साखरेचे उत्पादन अनुक्रमे २३.६६, २१.६४ आणि १८.७७ टन मिळाले. को ८६०३२ पेक्षा ऊस उत्पादन आडसालीमध्ये १३.३६, पूर्वहंगामात ११.६८ आणि सुरूमध्ये ११.०९ टक्के अधिक आणि साखर उत्पादन को ८६०३२ पेक्षा अनुक्रमे १३.०४, १५.४७ आणि ९.०६ टक्के अधिक मिळाले. फुले २६५ वाणाचे उत्पादनाबरोबर तुलना केली असता आडसाली आणि पूर्वहंगामात तुलनात्मक उत्पादन आढळून आले. साखर उत्पादनामध्ये व्यापारी शर्करा अनुक्रमे आडसालीमध्ये १४.६४, पूर्वहंगामात १४.१८ आणि सुरूमध्ये १४.३९ टक्के मिळाली. साखरेच्या युनिटमध्ये तुलना केली असता. को ८६०३२ पेक्षा ०.४ युनिटने व फुले २६५ पेक्षा ०.८ युनिटने व्यापारी शर्करा अधिक मिळाली. हा वाण खोडव्यासाठी उत्तम असून खोडव्याचे हेक्टरी ऊस उत्पादन १२८.५४ टन आणि साखरेचे उत्पादन १७.६७ टन मिळाले असून खोडव्यामध्ये व्यापारी शर्करा १४.१० टक्के मिळाली.

सद्यस्थितीत बियाणे उपलब्ध नाही. दहा उसापासून आठ महिन्याने चार एकर क्षेत्रावर लागवड करता येते. साधारणपणे २०० हेक्टर क्षेत्रावर लागवड केल्यानंतर पुढील वर्षी १०० पटीने क्षेत्र या वाणाखाली वाढविता येईल. या

वाणाच्या मुलभूत ऊस बियाणे विक्रीचा शुभारंभ बारामती येथील प्रगतशील शेतकरी श्री. विष्णू अण्णा हिंगने यांचे हस्ते बियाणे विक्री व वाटपाला सुरूवात केली. याप्रसंगी भिमा शंकर सहकारी साखर कारखाना लि., पारगाव व श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लि., दौंड यांचे वतीने नवीन वाणाच्या निर्मितीबद्दल पाडेगाव संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. भरत रासकर, ऊस विशेषज्ञ आणि शास्त्रज्ञांचे अभिनंदन केले व सत्कार केला. त्यांनी ३ ऊसाच्या माध्यमातून पुढील वर्षी १ एकरावर ऊस लागवड करता येईल हे पटवून दिले.

## मफुकृवि आयडॉल्सचा सत्कार उत्साहात संपन्न




**दि. २२ डिसेंबर, २०२२.** मफुकृवि आयडॉल्सचा सत्कार समारंभ विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांचे शुभहस्ते महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या डॉ. नानासाहेब पवार सभागृहात पार पडला. एमपीकेव्ही क्लायमेक्स २०२२ कार्यक्रमाच्या शेवटच्या सत्रात हा कार्यक्रम आयोजीत केला गेला. यावेळी व्यासपीठावर कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, अधिष्ठाता (कृषि) डॉ. प्रमोद रसाळ, संशोधन संचालक डॉ. सुनिल गोरंटीवार, विस्तार शिक्षण संचालक डॉ. तानाजी नरुटे, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे, नियंत्रक डॉ. बापुसाहेब भाकरे, सहयोगी अधिष्ठाता डॉ. उत्तम चव्हाण, डॉ. दिलीप पवार, डॉ. श्रीमंत रणपिसे, डॉ. चिंतामणी देवकर, डॉ. राजेंद्र सुर्यवंशी, डॉ. गोरक्ष ससाणे, प्रसारण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. पंडित खर्डे उपस्थित होते.

या समारंभात गतवर्षीचे चार आणि यावर्षीचे चोवीस अशा एकुण अठ्ठावीस मफुकृवि आयडॉल्सचा सत्कार करण्यात आला. यामध्ये स्मृतिचिन्ह, शाल आणि पुष्पगुच्छाचा समावेश होता. कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या संकल्पनेतून प्रत्येक महिन्याला विद्यापीठातून पदवी घेतलेला कृषि उद्योजक आणि एक प्रगतीशील शेतकरी अशा दोन मफुकृवि आयडॉल्सचा कार्यपरिचयाचा फलक विद्यापीठाच्या प्रवेशद्वाराजवळ, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र आणि विद्यार्थी वसतिगृहाच्या तसेच दहा जिल्ह्यातील कार्यक्षेत्रातील कृषि महाविद्यालये, संशोधन केंद्रे, कृषि तंत्र विद्यालये या ठिकाणी प्रदर्शित केला जातो. कुलगुरु डॉ. पाटील यावेळी म्हणाले की या उपक्रमामुळे ग्रामीण युवक, विद्यार्थी तसेच शेतकऱ्यांना या आदर्श मफुकृवि आयडॉल्सपासून प्रेरणा मिळेल आणि त्यांचा आदर्श घेऊन सर्वांना नविन उर्जा मिळेल. ते म्हणाले की कोणत्याही इतर सत्कारापेक्षा ज्या मातीत आपण शिकलो तेथे पुरस्कार मिळाल्याचा वेगळा आनंद असतो. सुरुवातीला विस्तार शिक्षण संचालक डॉ. तानाजी नरुटे यांनी प्रास्ताविक केले. प्रसारण केंद्राचे प्रमुख डॉ. पंडित खर्डे यांनी सर्वांचे स्वागत करुन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले आणि आयडॉल्सचा कार्यपरिचय करुन दिला. नियंत्रक डॉ. बापुसाहेब भाकरे यांनी आभार मानले. या मफुकृवि आयडॉल्समध्ये प्रामुख्याने सह्याद्री फार्मर्स कंपनीचे संस्थापक इंजि. विलास शिंदे, तसेच यशस्वी कृषि

उद्योजक डॉ. स्वप्नील बच्छाव, श्री. साहेबराव नवले पाटील, श्री. किरण कोठारी, श्री. दिलीप देशमुख, श्री. पंडित शिकारे, श्री. बाबासाहेब भोसले व इतरांचा समावेश आहे. शेतकरी आयडॉल्समध्ये श्री. साहेबराव चिकणे, कृषिभूषण डॉ. दत्तात्रय वने, श्री. राहुल रसाळ, श्री. ज्ञानेश्वर बोडके, डाळिंबरत्न डॉ. बाबासाहेब गोरे, डॉ. संजीव माने, कृषिरत्न श्री. रशिद गावित, श्री. महादेव जाधव व इतरांचा समावेश आहे.

## औषधी व सुगंधी वनस्पती संशोधन प्रकल्पातर्फे प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन





**दि. २९ डिसेंबर, २०२२.** भारतातील प्राचीन ग्रंथात औषधी वनस्पतींचा उल्लेख जागोजागी आढळतो. पूर्वीच्या काळी वेगवेगळ्या आजारांवर औषधी वनस्पतींद्वारेच उपचार व्हायचा. कोरोनाच्या काळातही औषधी वनस्पतींच्या उपचार परिणामकारक ठरला. औषधी वनस्पतींची बाजारपेठ मोठी असून भारतातील हवामान औषधी वनस्पतींच्या लागवडीसाठी पोषक असे आहे. त्याचबरोबर हवामान बदलाला सामोरे जातांना शेतकरी बांधवाना पीक पध्दतीत बदल करतांना औषधी वनस्पतींची लागवड फायदेशीर ठरु शकते असे प्रतिपादन कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या औषधी व सुगंधी वनस्पती प्रकल्प, कालीकत (केरळ) येथील सुपारी व मसाला विकास निदेशालय आणि पश्चिम विभागीय औषधी वनस्पती सुविधा केंद्र, पुणे तसेच नवी दिल्ली येथील आयुष मंत्रालयाचे राष्ट्रीय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय जिल्हास्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्राच्या उद्‌घाटन कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरुन कुलगुरु डॉ. पाटील बोलत होते. यावेळी संशोधन संचालक डॉ. सुनिल गोरंटीवार कार्यक्रमाचे सहअध्यक्ष म्हणुन उपस्थित होते. याप्रसंगी मुंबई येथील निशांत ॲरोमाज प्रा.लि.चे संचालक डॉ. रमाकांत हरलालका हे प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थित होते. याप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पश्चिम विभागीय औषधी वनस्पती सुविधा केंद्राचे प्रमुख संशोधक व विभागीय संचालक डॉ. दिगंबर मोकाट, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. शिवाजीराव जगताप, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजू अमोलिक, अखिल भारतीय समन्वीत औषधी, सुगंधी वनस्पती व पाणवेल प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. आर.टी. गायकवाड, प्रा. भारत पवार, औषधी व सुगंधी वनस्पती प्रकल्पाचे प्रभारी अधिकारी डॉ. विक्रम जांभळे व डॉ. शर्मिला शिंदे उपस्थित होते.

यावेळी डॉ. गोरंटीवार मार्गदर्शन करतांना म्हणाले औषधी वनस्पतींच्या जागतीक बाजारपेठेत ४० टक्के सहभाग भारताचा आहे. याचा फायदा जास्तीत जास्त शेतकऱ्यांना होण्यासाठी औषधी वनस्पतींच्या लागवडीमध्ये पीक व्यवस्थापन, मुल्यवर्धन आणि विपणन या गोष्टी महत्वाच्या ठरतील. याप्रसंगी डॉ. दिगंबर मोकाट, डॉ. रमाकांत हरलालका यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते औषधी व सुगंधी वनस्पतींवरील प्रकाशनाचे विमोचन करण्यात

आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ. विजू अमोलिक यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विक्रम जांभळे यांनी तर आभार डॉ. विलास आवारी यांनी मानले. या कार्यक्रमासाठी उद्योजक असलेले श्री. नानासाहेब भोसले, श्री. वैभव काळे, शेतकरी व महिला शेतकरी उपस्थित होते.

## जाधववाडी येथे अंजीर आणि सिताफळ कार्यशाळा संपन्न





**दि. २७ डिसेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, कृषि विभाग महाराष्ट्र शासन व पुणे जिल्हा सिताफळ बागायतदार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने अंजीर आणि सिताफळ कार्यशाळेचे आयोजन अखिल भारतीय समन्वित अंजीर सिताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी, ता. पुरंदर येथे करण्यात आले होते. कार्यशाळेचे अध्यक्षस्थान महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी भूषविले. कार्यशाळेस प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र कृषि शिक्षण आणि संशोधन परिषदेचे माजी उपाध्यक्ष श्री. विजय कोलते आणि उपविभागीय कृषि अधिकारी श्री. वैभव तांबे उपस्थित होते. तर गणेशखिंड, पुणे येथील विभागीय कृषि संशोधन केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. विनय सुपे, महाराष्ट्र राज्य अंजीर उत्पादक संघाचे अध्यक्ष श्री. आप्पासाहेब काळभोर, पुणे जिल्हा सिताफळ बागायतदार संघाचे अध्यक्ष श्री. प्रदीप आहेर आणि श्री. बंडूकाका जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. सदर कार्यशाळेत मान्यवरांच्या हस्ते अंजीर आणि सिताफळ या पिकांच्या लागवड पुस्तिकांचे प्रकाशन करण्यात आले.

कुलगुरू डॉ. पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी ही शेतकऱ्यांची पंढरी आहे असे प्रतिपादन करताना या विद्यापीठाला ५४ वर्षाचा इतिहास असून विद्यापीठाने ऊस, डाळिंब, हरभरा, ज्वारी, बाजरी, अंजीर, सीताफळ व इतर फळपिके यांच्या अनेक सुधारित जाती प्रसारित केलेल्या असून शेतकरीभिमुख संशोधन विद्यापीठात केले जाते. डॉ. सुपे यांनी आपल्या मार्गदर्शनात पिकातील रोग किडींचे व्यवस्थापन करताना झाडाची प्रतिकारकक्षमता वाढवणे गरजेचे आहे याचा विशेष उल्लेख केला. कृषि परिषदेचे माजी उपाध्यक्ष श्री. विजय कोलते यांनी त्यांच्या मनोगतामध्ये विद्यापीठाने शिफारसीत केलेल्या तंत्रज्ञानाचा व जातींचाच वापर करावा असे आवाहन केले. संशोधन केंद्र प्रमुख आणि उद्यानविद्यावेत्ता डॉ. प्रदीप दळवे आणि रोगशास्त्रज्ञ डॉ. युवराज बालगुडे यांनी अंजीर आणि सिताफळावर उपस्थित शेतकरी वर्गास मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वरिष्ठ संशोधन सहाय्यक श्री. नितीश घोडके यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. निलेश काळे यांनी केले. कार्यशाळा यशस्वीरीत्या संपन्न होणेकरीता वरिष्ठ संशोधन सहाय्यक श्री. सुनिल नाळे, छायाचित्रकार श्री. सुनिल घोरपडे तसेच श्री. संदीप लिंभोरे, श्री. सतीश काळे आणि श्री. अनंता झेंडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पिकांचे सूक्ष्म हवामानशास्त्र विषयावरील प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन



**दि. १ ते २१ डिसेंबर, २०२२.** हवामानशास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय, पुणे येथे पिकांचे सुक्ष्म हवामानशास्त्र या विषयावरील देशभरातील शास्त्राज्ञांकारिता २१ दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. सदरचे प्रशिक्षण महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या वतीने आयोजित करणेत आले. याप्रसंगी गुजरात येथील आनंद कृषि विद्यापीठ आणि कामधेनु पशुवैद्यकीय विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एम. सी. वार्ष्णेय यांनी सांगितले की सन १९३२ मध्ये शास्त्रज्ञ एल. ए. रामदास यांनी सर्वप्रथम हवामानशास्त्राचा अभ्यासाची सुरुवात पुणे कृषि महावियालयात केली व त्यासाठी उस पिकाची निवड केली. एव्हढेच नव्हे तर हवामानशास्त्राच्या अभ्यासावरील पहिला संशोधन पेपर सुद्धा पुण्यातच प्रकाशित केल्या गेल्याचेही त्यांनी सांगितले. याच सोबत नत्र, स्फुरद, पालाश, जमिनीची विद्युत वाहकता, सामू, सूक्ष्म अन्नद्रव्ये, सेंद्रिय कर्ब अशा अनेक महत्वाच्या बाबींचा समावेश करून हवामानशास्त्रातील नवीन प्रारूपे तयार करण्याची आवश्यकता व्यक्त केली.

कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी यानिमित्ताने सर्व प्रशिक्षाणार्थींना दिलेला संदेश कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनील मासळकर यांनी वाचला. आपल्या संदेशाद्वारे त्यांनी भारतीय संस्कृतीच्या विकासामधील पंचमहाभूतांचे महत्व विषद करत असताना या घटकांमधील असमतोल पर्यावरणास व पर्यायाने मानवी जीवनास धोकादायक असल्याचे प्रतिपादन केले. वातावरण व हवामान हे मानवी जीवनातील प्रत्येक घटक तथा पैलूंवर परिणाम करत असून अन्न, वस्त्र व निवारा या मानवी जीवनाच्या मुलभूत गरजा असून त्या पूर्णत: हवामान व भौगोलिक परिस्थितीनुसार बदलत असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी कृषि तंत्र विद्यालय, सोलापूरचे प्राचार्य डॉ. जयंत जाधव तसेच शास्त्रज्ञ प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. सदर प्रशिक्षणास महाराष्ट्रासह देशातील सहा राज्यातील पंचवीस शास्त्रज्ञ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक हवामानशास्त्र विभागाचे विभागप्रमुख व प्रशिक्षण केंद्राचे निर्देशक डॉ. विजय स्थूल यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. प्रांजली बगाडे व आभारप्रदर्शन संशोधन सहायक श्री. सुहास जाधव यांनी केले.

## कृषि विज्ञान केंद्र, बोरगांव (जि. सातारा) येथे सल्लागार समिती बैठक संपन्न

**दि. १२ डिसेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव ता. जि. सातारा येथे शास्त्रीय सल्लागार समितीची बैठक संपन्न झाली. सदर सल्लागार समिती बैठकीस मार्गदर्शन करताना विस्तार शिक्षण संचालक डॉ. तानाजी नरुटे म्हणाले की राज्य शासनाच्यावतीने शेतकऱ्यांसाठी विविध योजना येत असतात. शेतकऱ्यांनी



स्वावलंबी व समृद्ध होण्यासाठी कृषि विद्यापीठाच्या सुधारित तंत्रज्ञानाचा वापर करून कृषी विषयक योजनांचा लाभ घ्यावा तसेच कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून बीजोत्पादन प्रकल्प, विपणन तंत्रज्ञान, शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम प्रभावीपणे राबवावेत, शेतकऱ्याचे उत्पन्न कसे दुप्पट होईल या बाबीकडे विशेष लक्ष वेधणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. तदनंतर अटारी, पुणे येथून शास्त्रज्ञ डॉ. तुषार आठरे यांनी ऑनलाईन माध्यमातून या बैठकीस उपस्थित राहून काही ठळक मुद्दे मांडले.

या बैठकीस राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, पुणेचे डॉ. रामटेके, महिला आर्थिक विकास महामंडळाचे श्री. डोके, लीड बँकेचे प्रतिनिधी श्री. साबळे, जिल्हा रेशीम कार्यालय वाई येथील श्री. निकम, खादी ग्रामोद्योग व मध संचालनालय, महाबळेश्वर, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व आत्मा सातारा कार्यालयाचे प्रतिनिधी श्री. शेख, पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. पवार, कृषि सहाय्यक श्री.धनाजी फडतरे, राज्यस्तरीय खरीप भात पीक उत्पादन स्पर्धेचे प्रथम क्रमांकाचे मानकरी श्री. चिकणे, प्रगतशील शेतकरी श्री. समाधान कदम, श्री. राजेंद्र पवार, श्री. विजय जाधव, श्री. धनाजी डांगे, श्री. किर्वे यांनी उपस्थित राहून चर्चेत सहभाग घेतला. सुरवातीला कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. महेश बाबर यांनी बैठकीचा उद्देश सांगितला व सर्वांचे स्वागत केले. कार्यक्रम समन्वयक प्रा. मोहन शिर्के यांनी गतवर्षी दिलेल्या सूचना व कार्यवाही याबाबतचा अहवाल सदर केला. विषय विशेषज्ञ श्री. भूषण यादगीरवार यांनी केंद्रामार्फत राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे सादरीकरण केले. बैठकीनंतर मान्यवरांनी प्रक्षेत्रावरील विविध प्रात्यक्षिकांना भेटी देऊन माहिती घेतली. यावेळी नव्याने सुरु करण्यात आलेल्या कुक्कुटपालन प्रकल्पाचे उद्‌घाटन डॉ. नरुटे यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. कल्याण बाबर यांनी सूत्रसंचालन केले तर आभार डॉ. स्वाती गुरवे यांनी केले.

## ममुराबाद (जि. जळगाव) कृषि विज्ञान केंद्राची शास्त्रीय सल्लागार बैठक संपन्न

**दि. २७ डिसेंबर, २०२२.** ममुराबाद (जि. जळगाव) कृषि विज्ञान केंद्राची आठवी शास्त्रीय सल्लागार समिती बैठक विस्तार शिक्षण संचालक डॉ. तानाजी नरुटे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदरच्या बैठकीसाठी प्रमुख पाहुणे म्हणुन अटारी पुणेचे शास्त्रज्ञ डॉ. राजेश टी, केळी संशोधन केंद्राचे उद्यानविद्यावेत्ता डॉ. चंद्रशेखर पुजारी, कृषि विभागाचे उपसंचालक श्री. अनिल भोकरे, आत्माचे उपसंचालक श्री. कुर्बान तडवी, कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. मधुकर बेडीस, जैन इरिगेशन सिस्टम लि.चे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. बी.डी. जडे, नाबार्डचे जिल्हा व्यवस्थापक श्री. श्रीकांत झांबरे, पाल येथील कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ महेश महाजन, पशुसंवर्धन विभागाचे डॉ. पी.पी. पाटील, महिला आर्थिक विकास महामंडळाचे



श्री. उल्हास पाटील, कडधान्य पैदासकार डॉ. सुमेरसिंग राजपूत, कापुस पैदासकार डॉ जी.बी. चौधरी, डॉ. जी.पी. देशमुख, डॉ. बाबासाहेब भिंगारदे व तेलबिया संशोधन केंद्रातील इतर शास्त्रज्ञ उपस्थित होते. याचबरोबर विद्यापीठाचे आयडॉल श्री. नरेंद्र पाटील उपस्थित होते. डॉ. नरुटे यावेळी मार्गदर्शन करतांना म्हणाले की कृषि विज्ञान केंद्र, जळगाव यांच्या वतीने आयोजित विविध प्रयोग चाचणी व प्रात्यक्षिके याचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा तसेच कृषि विषयक व्यवसाय उभारावा. त्याचबरोबर विद्यापीठाचे सुधारित तंत्रज्ञान शेतकऱ्यांमध्ये प्रसार करावे. यावेळी विविध घडीपात्रिकांचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. राजेश टी. यांनी जास्तीत जास्त शेतकऱ्यांची कृषि सारथी पोर्टलवर नोंदणी करून सल्ला पुरवावा व प्रक्षेत्रावर नैसर्गिक शेती प्रात्यक्षिक प्लॉट करावा अशी सूचना केली. श्री. अनिल भोकरे यांनी रेशीम शेती, क्रॉप कव्हर तंत्रज्ञान, न्यूट्री सीरिअल गार्डन व मल्चिंग तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त प्रसार कृषि विज्ञान केंद्र व कृषि विभाग यांच्या मार्फत होतो असे सांगितले. प्रास्ताविक व सादरीकरण करताना ममुराबाद येथील कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. हेमंत बाहेती यांनी गतवर्षी दिलेल्या सूचना व कार्यवाही अहवाल सादर केला तसेच पुढील वर्षातील कामांचे नियोजन सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. किरण जाधव व आभार प्रदर्शन श्री किरण मांडवडे यांनी केले.

## कृषि महाविद्यालय, धुळे येथे विद्यापीठस्तरीय आंतरमहाविद्यालयीन अविष्कार २०२२ स्पर्धा संपन्न




**दि. १५ डिसेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत येणाऱ्या सर्व घटक आणि संलग्न कृषि महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती निर्माण होऊन त्यांच्यातील नवनवीन कल्पना, क्लुप्ती, विचार यांना

चालना देण्याच्या दृष्टिकोनातून कृषि महाविद्यालय, धुळे येथे विद्यापीठस्तरीय अंतर महाविद्यालयीन अविष्कार २०२२ या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर यांच्या अध्यक्षतेखाली ही स्पर्धा यशस्वीपणे संपन्न झाली. या स्पर्धेसाठी जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. आशुतोष पाटील हे प्रमुख पाहुणे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी निरीक्षक म्हणून राहुरी कृषि विद्यापीठातील डॉ. अतुल अत्रे, प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महावीरसिंग चौहान, कृषि तंत्र विद्यालय धुळेचे प्राचार्य डॉ. राहुल देसले, विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. घनश्याम काबरे आणि अविष्कारचे समन्वयक डॉ. संदीप पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संदीप पाटील यांनी केले. त्यांनी एकूण ३७ कृषि व कृषि संलग्न महाविद्यालयातील २८० विद्यार्थी–विद्यार्थिनी या स्पर्धेत भाग घेतल्याची माहिती दिली. डॉ चौहान यांनी या कार्यक्रमाप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करत सहभागी विद्यार्थी, विद्यार्थिनी यांना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

डॉ. आशुतोष पाटील आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की आविष्कारच्या माध्यमातून नविन संशोधक उदयास येऊन विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीला चालना मिळणार आहे. तसेच हे संशोधन मानवी जातीला अधिक सुखकारक व शेतीमध्ये आमुलाग्र बदल घडविण्यात मोलाची भूमिका बजावेल असे प्रतिपादन केले. अध्यक्षीय मार्गदर्शनात डॉ. चिंतामणी देवकर यांनी आविष्कारमुळे संशोधन वृत्तीला चालना मिळणार असुन विद्यार्थी यांच्यासाठी हि स्पर्धा उत्तम व्यासपीठ असल्याचे प्रतिपादन केले. दोन दिवस पार पडलेल्या या स्पर्धेत मानवता भाषा आणि कला, वाणिज्य व्यवस्थापन आणि विधी, विज्ञान आणि तंत्रज्ञान, कृषि आणि पशुसंवर्धन, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान तसेच वैद्यकीय आणि औषधी अशा सहा प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी त्यांचे संशोधन आणि कल्पना पोस्टर्स, मॉडेल, विविध पदार्थ याद्वारे मांडण्यात आले. या विद्यार्थ्यांमधून सर्वोत्कृष्ट संशोधन आणि कल्पना सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांचे विविध विभागातील तज्ञ परीक्षक मार्फत मूल्यमापन करून विजेतीपदे घोषित करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.जितेंद्र सूर्यवंशी यांनी केले. महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे शास्त्रज्ञ सल्लागार समितीची बैठक संपन्न



**दि. २८ डिसेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या धुळे येथील कृषि विज्ञान केंद्राच्या शास्त्रज्ञ सल्लागार समितीची बैठक कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व विस्तार शिक्षण संचालक डॉ. तानाजी नरुटे यांच्या उपअध्यक्षतेखाली पार पडली. कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे यांनी कृषि विज्ञान केंद्राचा

प्रगती अहवाल सादर केला. यावेळी डॉ. नरुटे म्हणाले की, शेतकऱ्यांनी शाश्वततेसाठी उत्पन्न व उत्पादकता वाढवण्यासाठी एकात्मिक शेती मॉडेल तसेच सेंद्रिय शेती पद्धतीचा अवलंब करावा. पशुसंवर्धन व पशुपालनाचे महत्त्व लक्षात घेता कृषि विज्ञान केंद्राने पशुसंवर्धन विभाग यांच्या सोबत काम करावे. त्याबरोबरच आंतरराष्ट्रीय भरडधान्य २०२३ अभियानामध्ये कृषि विज्ञान केंद्राने उत्स्फूर्त सहभाग नोंदवत कार्यक्रम घ्यावेत अशा सूचना करत मार्गदर्शन केले. या बैठकीसाठी अटारी पुणेचे शास्त्रज्ञ डॉ. राजेश टी, धुळे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर, श्री. शांताराम मालपुरे, गहू विशेषज्ञ डॉ. सुरेश दोडके, शेतीशाळेचे प्राचार्य डॉ. राहुल देसले, डॉ. मिलिंद भंगे, डॉ. हेमंत पाटील, श्री. किरण पाडवी, डॉ. खुशाल बऱ्हाटे, डॉ. गिरीश चौधरी, श्री. सुनीलकुमार राठी, डॉ. बाबासाहेब भिंगारदे आदी उपस्थित होते. यावेळी शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते. डॉ. चिंतामणी देवकर यांनी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी कृषि विज्ञान केंद्राच्या भूमिकेवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अम्रिता राऊत तर आभार डॉ. अतिश पाटील यांनी मानले.

## कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ (जि. सोलापूर) येथे शास्त्रीय सल्लागार समितीची बैठक संपन्न



**दि. २९ डिसेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेले कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ, जि. सोलापूर येथे शास्त्रीय सल्लागार समितीची बैठक संपन्न झाली. यावेळी ऑनलाईनपध्दतीने कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील आणि अटारी पुणेचे संचालक डॉ. लाखन सिंग या बैठकीत सहभागी झाले होते. यावेळी विस्तार शिक्षण संचालक डॉ. तानाजी नरुटे, विभागीय कृषि संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. विजय अमृतसागर, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. बाळासाहेब शिंदे, नाबार्डचे जिल्हा व्यवस्थापक श्री. नितीन शेळके, रेशीम विस्तार अधिकारी श्री. विश्वजीत पावसकर, कार्यक्रम समन्वयक डॉ. तानाजी वळकुंडे, प्रगतशील शेतकरी संदिप पवार, स्वाती पाटील, ओकार वाटाणे, राजाभाऊ भंगीरे, गणेश माळी, ए.पी. गलांडे आदी उपस्थित होते. यावेळी कुलगुरु डॉ. पाटील मार्गदर्शन करतांना म्हणाले की कृषि समृध्द आदर्शगाव निर्मितीसाठी कृषि विज्ञान केंद्र हे उत्तम माध्यम आहे. शेतकऱ्यांनी कृषि विज्ञान केंद्राच्या तंत्रज्ञानाचा अधिकाधिक उपयोग करतांना एकात्मिक शेती पध्दतीवर भर द्यावा. डॉ. नरुटे यांनी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये एकात्मिक शेती पध्दतीने विकसीत कृषि समृध्द गाव निर्माण करण्यात कृषि विज्ञान केंद्राने पुढाकार घ्यावा असे मत व्यक्त केले. डॉ. वळकुंडे यांनी पीक पात्यक्षिके, प्रशिक्षणे, विविध विस्तार कार्यक्रम व राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांचा आढावा सादर केला. यावेळी विविध विषयांवरील घडीपत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांच्या कृषि प्रक्रिया उद्योजकांच्या उत्पादनांची मांडणी करण्यात आली होती.

## सिल्लोड येथील कृषि प्रदर्शनासाठी राहुरी विद्यापीठातील शास्त्रज्ञ रवाना



**दि. ३१ डिसेंबर, २०२२.** औरंगाबाद जिल्ह्यातील सिल्लोड येथे दि. १ ते ५ जानेवारी, २०२३ या दरम्यान होणाऱ्या कृषि महोत्सवासाठी कुलगुरू डॉ. पी.जी.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा फुले कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञ व कर्मचारी विशेष बसद्वारे रवाना झाले. या बसला विस्तार शिक्षण संचालक डॉ. तानाजी नरुटे, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे यांनी हिरवा झेंडा दाखविला. यावेळी विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. तानाजी नरुटे म्हणाले की या कृषि महोत्सवातील महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या स्टॉलमध्ये विद्यापीठाने विकसित शेतकरिभिमुख तंत्रज्ञान,विद्यापीठ विकसित विविध पिकांचे वाण, ड्रोन तंत्रज्ञान व इतर तंत्रज्ञान बघण्यास मिळणार आहे. या विद्यापीठाच्या प्रदर्शनाच्या स्टॉलला जास्तीत जास्त शेतकरी बंधूंनी भेट देऊन विद्यापीठाने विकसित केलेल्या नवीन तंत्रज्ञानाबद्दलची माहिती घ्यावी असे आवाहन त्यांनी यावेळी बोलताना केले.

## पुणे कृषि महाविद्यालयाचे जागतिक मृदा दिनानिमित्त शेतकऱ्यांना मार्गदर्शन



**दि. ५ डिसेंबर, २०२२.** ग्रामीण कृषि जागरूकता आणि औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत हवेली तालुक्यातील मौजे शिवापुर व कोंढणपुर येथे जागतिक मृदा दिवसानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या मध्ये माती–पाणी परीक्षणाचे महत्व, मृदा आरोग्य, सेंद्रिय व शाश्वत शेती, जमिनीची धूप कमी करण्यासाठीच्या उपाय–योजना या विषयांवर

तज्ञ शास्त्रज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्याने तसेच पिके व फळबाग लागवडीकरिता माती परीक्षणासाठी नमुना घ्यावयाचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. या प्रसंगी कृषि महाविद्यालयातील मृद विज्ञान व कृषि रसायनशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. अनिल बुलबुले, सहयोगी प्राध्यापक डॉ. अविनाश गोसावी, सहाय्यक प्राध्यापक डॉ. अभय पाटील व रावे कार्यक्रमाचे केंद्रप्रमुख डॉ. मृणाल अजोतीकर व कार्यक्रम अधिकारी डॉ. आनंद जाधव या तज्ञांचे माती विषयी मार्गदर्शन शेतकऱ्यांना लाभले. या दरम्यान शेतकऱ्यांच्या कृषि विषयक शंकांचे निरसन चर्चात्मक पद्धतीने करण्यात आले. त्याचबरोबर कृषि महाविद्यालय, पुणे येथील कृषि अवशेष व्यवस्थापन शिक्षण कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी निर्मित केलेले गांडूळ खत व व्हर्मिवॉश या सेंद्रिय निविष्ठांचे फायदे व वापराबाबत सखोल माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली. कार्यक्रमास कृषि सहाय्यक सौ. साळुंखे, सौ. कादबाणे, श्री.मिटके तसेच कृषि विभागाचे अन्य पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमांना दोन्ही गावातील शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## धुळे कृषि महाविद्यालयात जागतिक मृदा दिनाचे आयोजन



**दि. ५ डिसेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेले धुळे कृषि महाविद्यालयात जागतिक मृदा दिनाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर हे होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना डॉ. देवकर यांनी पौष्टिक अन्नधान्य निर्मितीसाठी मृदेचे आरोग्य जपणे कसे महत्वाचे आहे तसेच मृदेमधील सेंद्रिय कर्बाची कशी घट होत आहे याबद्दल सविस्तर माहिती दिली. मृदविज्ञान व कृषि रसायनशास्त्र विभागाचे डॉ. व्ही.पी. भालेराव यांनी कृषि उत्पादनवाढीसाठी रासायनिक खतांचा, किटकनाशकांचा, तणनाशकांचा कसा भरमसाठ वापर केला जात आहे व त्यामुळे कसा मृदेचा ऱ्हास होत आहे याबद्दल उपस्थितांना अवगत केले. मृदेचा होणारा ऱ्हास टाळण्यासाठी व मृदेचे आरोग्य सुधारण्यासाठी सेंद्रिय शेती, नैसर्गिक शेती व इतर विविध उपाययोजनांची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. व्ही.पी. भालेराव यांनी केले. या कार्यक्रमास कृषि महाविद्यालयातील डॉ. पी. डी. सोनवणे, डॉ. पांडुरंग शेंडगे, डॉ.जी.बी.काबरे, डॉ. खुशाल बराटे, डॉ. संदीप पाटील, डॉ. व्ही. बी. भावसार, डॉ. विक्रांत भालेराव, डॉ. एस. पी. निकम, प्रा. विपुल वसावे, प्रा.श्रीधर देसले, डॉ. संदीप पोळ, डॉ. राखी मेश्राम तसेच सर्व प्राध्यापक, अधिकारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. जे. एस. सुर्यवंशी यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. विकास पवार यांनी केले.

## महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पातील प्रशिक्षणार्थींची अंजीर व सिताफळ संशोधन केंद्रास भेट





**दि. २१ डिसेंबर, २०२२.** महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प, पुणे यांनी पेरू व सिताफळ काढणी पश्चात हाताळणी याविषयावर पाच दिवसीय प्रशिक्षण आयोजित केले होते. यातील प्रशिक्षणार्थींनी अखिल भारतीय समन्वित अंजीर आणि सिताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी, ता. पुरंदर येथे भेट दिली. यावेळी संशोधन केंद्रप्रमुख डॉ. प्रदीप दळवे यांनी सिताफळ लागवड तंत्रज्ञान, बहार व्यवस्थापन तसेच सिताफळ काढणी पश्चात हाताळणी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. युवराज बालगुडे, वनस्पती रोगशास्त्रज्ञ यांनी सिताफळ पिकातील एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले. सदर प्रशिक्षणास राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान केंद्र तळेगाव येथील डॉ. भास्कर पाटील, श्री संतोष डोईफोडे, सौ. आरती मगर, श्री. संपत यादव व मॅग्नेट प्रकल्पाचे डॉ. अश्विनी दरेकर, सौ. मेघा जोशी व महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचे श्री. तुषार जंगम आणि राज्याच्या विविध भागातून सहभागी झालेले प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. मार्गदर्शनाच्या समारोपानंतर शिवार फेरी घेण्यात आली. सदर प्रक्षेत्र भेट यशस्वी होणेकरीता श्री. संदीप लिंभोरे व श्री. आनंता झेंडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांच्या टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांच्या शेतावर भेटी व मागदर्शन



**दि. २ डिसेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील वनस्पती रोगशास्त्र व अणुजीवशास्त्र विभाग आणि कृषि

विभाग, महाराष्ट्र शासन यांचे संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या हॉर्टसॅप प्रकल्पामार्फत जि. औरंगाबाद येथील कन्नड तालुक्यातील रेल नाव्हाडी, लव्हाळी, गल्ले बोरगांव, हातनुर व देवगांव रंगारी या गावांना विद्यापीठातील शास्त्रज्ञ व कृषि विभागातील अधिकारी यांनी भेटी दिल्या. या चमूमध्ये हॉर्टसॅप प्रकल्पातील संशोधन सहयोगी डॉ. प्रविण खैरे व कन्नड तालुका कृषि अधिकारी श्री. बाळराजे मुळीक, मंडळ कृषि अधिकारी के.एम. घुगरकर, कृषि पर्यवेक्षक राजेंद्र शिंदे, कृषि सहाय्यक श्रीमती देवरे व त्यांच्या विभागाचे कृषि अधिकारी यांचा समावेश होता. या भेटी दरम्यान शास्त्रज्ञ व अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष शेतावर जाऊन टोमॅटो उत्पादक शेतकरी यांच्यामध्ये सविस्तर चर्चा केली आणि चर्चेदरम्यान शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन करुन टोमॅटोच्या अधिक उत्पादनासाठी सविस्तर मार्गदर्शन केले. सध्या शेतकऱ्यांच्या टोमॅटो पिकावर रसशोषण करणाऱ्या किडींचा व रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. त्यामध्ये पांढरी माशी, फळ पोखरणारी अळी व टूटा नागअळी या किडींचा व बुरशीजन्य करपा या रोगाचा प्रादुर्भाव प्रामुख्याने दिसून येत आहे. त्या अनुषंगाने किड व रोगाच्या एकात्मिक नियंत्रणासाठी विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले. आर्थिक नुकसान पातळीच्यावर गेलेल्या गावांसाठी हॉर्टसॅप प्रकल्पांतर्गत वेळोवेळी एन.सी.आय.पी.एम., न्यु दिल्ली या संकेतस्थळावर विद्यापीठामार्फत सदर पिकासाठी पीक सरंक्षण सल्ला दिला जातो. तसेच टोमॅटो पीक किड व रोग नियंत्रण सल्ला यांच्या ५० प्रति शेतकऱ्यांना देण्यात आल्या. सदर प्रक्षेत्र भेटीसाठी विस्तार शिक्षण संचालक डॉ. तानाजी नरुटे व वनस्पती रोगशास्त्र व कृषि अणुजीवशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक तथा हॉर्टसॅप प्रकल्प समन्वयक डॉ. संजय कोळसे यांचे मार्गदर्शन लाभले.

## कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञ व कृषि अधिकारी शेतकऱ्यांच्या बाधांवर



**दि. २९ डिसेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील वनस्पती रोगशास्त्र विभाग व कृषि विभाग महाराष्ट्र शासन यांचे संयुक्त विद्यमाने राज्यभर राबविण्यात येणाऱ्या फलोत्पादन पिकांवरील किड रोग सर्वेक्षण सल्ला व व्यवस्थापन प्रकल्प (हॉर्टसॅप) मार्फत मफुकृवि, राहुरीच्या हॉर्टसॅप प्रकल्पातील संशोधन सहयोगी डॉ. प्रविण खैरे, अकोले तालुक्याचे मंडळ कृषि अधिकारी डॉ. रविंद्र रोकडे, कृषि पर्यवेक्षक श्री. रायभान गायकवाड, कृषि सहाय्यक श्री. हरिभाऊ जाधव यांनी अहमदनगर जिल्हयातील अकोले तालुक्यामधील पिंपळगाव नाकविंदा, शरंखेळ व धामनगाव आवारी या गावांना भेटी दिल्या. या भेटी दरम्यान या चमूने शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन टोमॅटो उत्पादक शेतकरी यांच्याबरोबर सविस्तर तांत्रिक चर्चा केली. चर्चेदरम्यान शेतकऱ्यांना रोग व किड नियंत्रणाचे मार्गदर्शन करुन टोमॅटोच्या अधिक व निरोगी उत्पादनासाठी सविस्तर माहिती दिली. सध्या शेतकऱ्यांच्या टोमॅटो पिकावर रसशोषण करणाऱ्या किडींचा व रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या

प्रमाणात दिसून येत आहे. त्यामध्ये फळ पोखरणारी अळी व टूटा नागअळी या किडींचा व बुरशीजन्य करपा या रोगाचा प्रादुर्भाव प्रामुख्याने दिसून येत आहे. त्या अनुषंगाने कीड व रोगाच्या एकात्मिक नियंत्रणासाठी विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. आर्थिक नुकसान पातळीच्यावर गेलेल्या गावांसाठी हॉर्टसॅप प्रकल्पांतर्गत वेळोवेळी एन.सी.आय.पी.एम., नवी दिल्ली या संकेतस्थळावर विद्यापीठामार्फत सदर पिकासाठी पीक सरंक्षण सल्ला दिला जातो. तसेच टोमॅटो पीक कीड व रोग नियंत्रण सल्ला यांच्या घडी प्रत्रिका शेतकऱ्यांना देण्यात आल्या. सदर प्रक्षेत्र भेटीसाठी प्रकल्प समन्वयक तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. तानाजी नरुटे, समन्वयक तथा सहयोगी प्राध्यापक डॉ. संजय कोळसे व टोमॅटो सुधार योजनेचे प्रभारी अधिकारी डॉ. अनिकेत चंदनशिवे यांनी मार्गदर्शन केले.

## धुळे कृषि महाविद्यालयात प्रथम वर्ष विद्यार्थी ओळख परिचय कार्यक्रम संपन्न




**दि. ५ डिसेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेले कृषि महाविद्यालय, धुळे येथे कृषि पदवीच्या प्रथम वर्षामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थांसाठी ओळख परिचय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर हे होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना डॉ. देवकर यांनी कृषि महाविद्यालयाच्या स्थापनेपासून ते सद्यस्थिती व भविष्यातील उपलब्धी यावर कटाक्ष टाकला. तसेच महाविद्यालयातील सध्या उपलब्ध सोयीसुविधा यांची विद्यार्थ्यांना माहिती दिली. यावेळी विद्यार्थी व प्राध्यापक यांचा ओळख परिचय करून देण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. जी.बी. काबरे यांनी नविन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक नियमांबद्दल मार्गदर्शन केले. डॉ. पी. डी. सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना कृषि अभ्यासक्रमाविषयी मार्गदर्शन केले. प्रा. जे. एस. सुर्यवंशी यांनी विद्यार्थी परिषदेद्वारे राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची माहिती दिली. डॉ. व्ही. बी. भावसार यांनी वसतीगृह नियमांची माहिती दिली. डॉ. संदीप पाटील यांनी शिष्यवृत्तीबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. डॉ. के. बी. पाटील यांनी महाविद्यालयाच्या क्रीडा सुविधा व आयोजित करण्यात येणाऱ्या विविध क्रीडा स्पर्धांबद्दल माहिती सादर केली. यानंतर प्रा. पी. बी. देवरे यांनी राष्ट्रीय छात्र सेना तर डॉ. एस. डी. पाटील यांनी राष्ट्रीय सेवा योजनेबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. जे. एस. सुर्यवंशी यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. विकास पवार यांनी केले.

## कृषि तंत्र विद्यालय बीजोत्पादन पहाणी



**दि. २४ डिसेंबर, २०२२.** कृषि तंत्र विद्यालय, कसबे डिग्रज (जि. सांगली) येथील हरभरा पैदासकार बीजोत्पादन प्लॉटची महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील बियाणे अधिकारी डॉ. चंद्रकांत साळुंखे, डॉ. कैलास गागरे, डॉ. विवेकानंद कुलकर्णी यांनी निरीक्षण व पाहणी केली. तंत्र विद्यालयाच्या विद्यार्थांनी स्वतः प्रात्यक्षिक करून बीजप्रक्रिया, खते, पाणी व्यवस्थापन आणि वेळेत पीक संरक्षण करून फुले विजय या हरभरा वाणाचा पैदाकार बियाणे प्लॉट उत्तम आला आहे असे विशद करून डॉ. साळुंखे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. प्राचार्य डॉ. मनोज माळी, प्रदीप पाटील, नितीन घोरपडे यांनी विद्यार्थायांकडून वेळोवेळी प्रात्यक्षिके करून घेतली.

## हाळगांव कृषि महाविद्यालयातील विद्यार्थीनीचा ट्रिपल जम्प स्पर्धेत तृतीय क्रमांक



**दि. ९ डिसेंबर, २०२२.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि जैव तंत्रज्ञान महाविद्यालय, लोणी येथे झालेल्या आंतरमहाविद्यालयीन अथेलेटिक्स स्पर्धा २०२२–२३ या स्पर्धेत महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगावच्या चतुर्थ वर्षातील विद्यार्थिनी कु. प्रज्ञा घुले हिने ट्रिपल जम्प स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविला. या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील एकूण ३८ संघांनी आपला सहभाग नोंदविला होता. कृषि महाविद्यालय, हाळगावचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. गोरक्ष ससाणे यांनी कु. प्रज्ञा हिचे अभिनंदन केले. संघ व्यवस्थापक म्हणून महाविद्यालयाच्या प्रा. किर्ती भांगरे यांनी काम पाहिले. क्रीडा अधिकारी प्रा. दिलीप गायकवाड, डॉ. चारुदत्त चौधरी यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले.

वर्ष :२, अंक क्रं. : २४, डिसेंबर, २०२२ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## जानेवारी महिन्यातील कृषि सल्ला

### भुईमूग (उन्हाळी)

- जानेवारीच्या तिसऱ्या आठवड्यात पेरणी करता येईल अशा बेताने पेरणीपुर्व ओलीत करावे.
- पेरणीसाठी सुधारीत फुले उन्नती, टी.ए.जी.२४,टी.जी.२६, टी.पी.जे.४१,जे.एल.५०१ , एस.बी ११, फुले भारती या वाणापैकी निवड करावी.
- उन्हाळी भुईमूगाची पेरणी १५ जानेवारी ते १५ फेब्रुवारी दरम्यान करावी.
- पेरणीचे अंतर ३०ु१० से.मी. ठेवावे त्यासाठी हेक्टरी १०० ते १२० किलो बियाणे वापरावे.
- पेरणीपुर्वी ३ ग्रॅम मॅन्कोझेब किंवा २ ग्रॅम कार्बेन्डझिम प्रती किलो बियाणास वापरून बीजप्रकिया करावी.

### ऊस

- ऊस बांधणीच्या अवस्थेत असलेल्या आडसाली उसाला हेक्टरी १६० किलो नत्र (३४५ किलो युरिया), ८५ किलो स्फुरद (५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) आणि ८५ किलो पालाश (१४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश)खतमात्रा देऊन ऊस बांधणी करावी. को–८६०३२ या ऊस जातीसाठी २५% रासायनिक खतमात्रा वाढवून द्यावी.
- पूर्व हंगामी उसातील आंतरपिकाची बटाटा, फ्लॉवर, कोबी, मुळा, गाजर, व कांदा इ. पिकांची काढणी त्यांची अवस्था पाहून करावी.
- १२ ते १६ आठवडे झालेल्या उसाला नत्राचा तिसरा हप्ता द्यावा. यासाठी हेक्टरी ३४ किलो नत्र (७४ किलो युरिया) वापरावे, नत्रयुक्त खाताबरोबर ६:१ या प्रमाणात निंबोळी पेंडीची भुकटी खतामध्ये मिसळून द्यावी.
- उसाची लागण सलग सरीवर मध्यम जमिनीत १००–१२० सें.मी., भारी जमिनीत १२०–१५० सें.मी. अंतरावर करावी अथवा ७५–१५० सें.मी. किंवा ९०–१८० सें.मी. जोड ओळ पध्दतीने करावी.

- **हरभरा व्यवस्थापन**
- जिरायती पिकांच्या वाणांची पक्वतेनुसार काढ़णी व मळणी करावी.
- बागायती हरभऱ्यासाठी घाटे भरण्याच्या अवस्थेत पाणी दयावे.
- किड व रोगांपासून संरक्षण करण्यासाठी शिफारशीत उपाययोजना करावी.

### रब्बी ज्वारी

- पहिला पंधरवाडा– पक्षांपासून संरक्षण करावे.
- दुसरा पंधरवाडा–ज्वारीच्या दाण्याच्या टोकाजवळ काळा ठिपक्याचे लक्षणे दिसताच ज्वारीची काढणी करावी व ८ ते १० दिवस कणसे उन्हात वाळवावीत.

### गहू

- उशिरा पेरणी केलेल्या गहू क्षेत्रातील जमिनीत कायमस्वरूपी ओलावा राहून पीक क्षेत्रात थंड हवामान राखण्यासाठी पिकास नेहमीपेक्षा कमी अंतराने म्हणजे १५ दिवसांनी योग्य मात्रेत पाणी दयावे.
- उशिरा पेरणी केलेल्या गहू क्षेत्रात तापमान कमी रहावे म्हणून गव्हासाठी तुषार सिंचनाचा वापर करावा. तुषारने शेवटचे पाणी ८० ते ८५ दिवसांदरम्यान दयावे.

- अवेळी पडलेल्या पावसामुळे किंवा तुषार पध्दतीने घेतलेल्या गहू क्षेत्रात दाणे काळे पडण्याची शक्यता असते ते टाळण्यासाठी दाणे भरण्याच्या अवस्थेत मेन्कोझेब + कॉपर ऑक्सिक्लोराईड, प्रत्येकी २० ग्रॅम, १० लि. पाण्यातून फवारावे.
- गहू पिकावर पेरणीनंतर ५५ व ७० दिवसांनी, दोन वेळा १९:१९:१९ या विद्राव्य खताची १० लि. पाण्यात २०० ग्रॅम या प्रमाणात फवारणी करावी.

**फळबाग व्यवस्थापन**

- डाळिंब–छाटणी करणे. आंबिया बहार धरावा, खताच्या योग्य रितीत मात्रा दयावी. आवश्यक असण्यास पानगळ करावी.
- बॅक्टेरीयल ब्लाईट (तेल्या) व रस शोषणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी उपाययोजना करावी.
- बोर–पक्व फळांची काढणी करावी.
- अंजीर–फळांच्या संरक्षणासाठी जाळीचा वापर करावा. नियमित पाणी पुरवठा करावा.
- जांभूळ–खतांच्या मात्रा द्याव्यात.
- सिताफळ–सिताफळाचे स्टोनीफ्रुट काढून घेऊन बिगर हंगामी बहार धरावयाचा असल्यास शिफारशीत हलकी छाटणी करावी.
- कागदी लिंबू–शिफारशीत खतमात्रेच्या ३०% नत्राची मात्रा द्यावी. मृग बहाराच्या फळांची काढणी करावी.
- मोसंबी व कागदी लिंबू–मावा, सिल्ला आणि पाने पोखरणारी अळी : थायोमिथोक्झाम (२५ग्रॅम) १ ते १.५ ग्रॅम/१०लि. पाण्यातून फवारावे.

- **भाजीपाला व्यवस्थापन**

- उन्हाळी हंगामातील भाजीपाला पिकांची लागवड करणेसाठी रान तयार करणे.
- उन्हाळी भाजीपाला उदा. भेंडी, गवार, कलिंगड, खरबूज, कारली, दुधी भोपळा, दोडका इ. पिकांची लागवड १५ जानेवारी नंतर करावी.
- खरीप हंगामातील मिरची पिकाची काढणी १० दिवसाच्या अंतराने करावी.
- खरीप हंगामातील वांगी पिकाची काढणी ४ ते ५ दिवसाचे अंतराने करावी.
- रबी हंगामातील लागवड करण्यात आलेल्या कोबीवर्गीय पिकांची खुरपणी करून पीक स्वच्छ ठेवावे.
- कोबीवर्गीय पिकांचे गड्डे तयार झाले असल्यास काढणी करावी.
- लसूण पीक दोन महिन्याचे झाले असल्यास खुरपणी करून नत्र खताचा दुसरा व अंतिम हप्ता द्यावा.
- वाटाणा पिकाची काढणी वेळेवर करावी जेणेकरून त्याची गोडी कमी होणार नाही.
- रबी हंगामातील टोमॅटो पीक फुलोरा अवस्थेत असल्यास खुरपणी करून शेत स्वच्छ करावे व खताची मात्रा द्यावी.
- टोमॅटो पिकास आधार देण्याचे काम पूर्ण करावे.
- रांगडा हंगामातील कांदा खुरपूण स्वच्छ करावा कांदा पोसण्याच्या अवस्थेत असल्याने खते देण्याचे टाळावे.
- रबी कांदा एक महिन्याचा झाला असल्यास खुरपणी करून नत्र खताचा हप्ता द्यावा.

**आले**

- आल्याचे विविध प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करण्यासाठी लागणीनंतर नऊ महिन्यानंतर आल्याची काढणी करावी.

- बाजारातील मागणीप्रमाणे आल्याची काढणी करावी. गड्डे बाहेर काढताना त्यांना इजा होणार नाही याची खबरदारी घ्यावी. आल्याचा पाला कापून गड्डे, बोटे (नवीन आले) काढणीनंतर वेगळे करावे.
- काढणीनंतर आल्याचे कंद स्वच्छ धुवून मातीपासून वेगळे करावेत आणि बाजारात पाठवावे.
- प्रति हेक्टरी ओल्या आल्याचे सरासरी उत्पादन २० ते २५ क्विंटल पर्यंत येते.
- उत्तम निचऱ्याची जमीन असेल तर हेच आले १४ ते १६ महिने जमिनीमध्ये ठेवून आल्याचे व्दिहंगामी पीक घेता येते आणि याचे उत्पन्न पहिल्या वर्षापेक्षा दीडपट ते दुप्पट मिळते.
- आल्याची पाने सुकल्यानंतर आठ ते दहा दिवसांनी या पिकास पाणी द्यावे. साधारणत: अडीच ते तीन महिन्यानंतर पुन्हा नवीन फुटवे फुटु लागतात.

### अवजारे

### ट्रॅक्टरचलित फुले ऊस रोपे पुर्नलागवड यंत्र

- ४५ अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरने चालविता येते.
- १२० सें.मी. ते १५० सें.मी. दोन ओळीतील अंतरावर ऊस रोपांची पुर्नलागवड करण्यासाठी उपयुक्त.
- एका दिवसात २.७५ ते ३.०० हेक्टर क्षेत्रावर ऊस रोपांची पुर्नलागवड शक्य.
- पारंपारिक खर्चापेक्षा खर्चात ६० ते ७० % बचत.
- पारंपारिक पद्धतीपेक्षा वेळेमध्ये ७० ते ८० % बचत.

प्रकाशक : डॉ. तानाजी नरुटे
संचालक, विस्तार शिक्षण
प्रमुख संपादक : डॉ. पंडित खर्डे
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र
सहसंपादक : डॉ. सचिन सदाफळ
सहाय्यक प्राध्यापक, प्रसारण केंद्र
श्री. सुनिल राजमाने
कृषि सहाय्यक, प्रसारण केंद्र
डिझाईनर : श्री. प्रदिप कोळपकर
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
श्री. सिध्दार्थ साळवे
लिपीक–नि–टंकलेखक, प्रसारण केंद्र

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २५११/२०२३